शंभूचरित्र भाग:- ०१

(सूचना:- "धर्मपंडित श्री छत्रपती संभाजी महाराज" यांचे चारित्र्य "प्राध्यापक माननीय श्री नितीन बानुगडे पाटील" यांचा व्याख्यानाच्या शब्दानिधीतून रेखाटण्याचा माझा प्रयत्न आहे. "संभाजी राजांचा" खरा इतिहास सर्वांना कळवा यासाठीचा माझा लेखन प्रपंच आहे. आजपासून ते शंभू राजांच्या बलिदान दिनापर्यंत "श्री शंभू चारित्र्य" या "भगवं वादळं" च्या माध्यमातून सर्वासमोर येईल तरी सर्वांनी वाचावे हि विनंती. खूप मोठं आहे वेळ नाही वाचायला असे बोलून कोणीही टाळाटाळ करू नका. अरे! आपले "शंभू राजे" आभाळापेक्षा मोठे होते आणि त्यांचा पराक्रम जाणून घेणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे कृपया शेअर करा..अरे! कळूद्या संपूर्ण जगाला आपला "संभाजी राजा" कसा होता ते. शेअर करा!!! .)

"इतिहास विसरणारी माणसं इतिहास घडवू शकत नाही आणि इतिहास घडवणारी माणसं इतिहास विसरू शकत नाही" हाही एक इतिहास आहे. 'निरक्षरं मराठ्यांचा' इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा इतका "तेजस्वी" आणि "ओजस्वी" इतिहास याच मातीत घडला मात्रं 'साक्षरं मराठे' त्यापासून बेदखल राहिले कि काय? अशी शंका अलीकडे येऊ लागली आहे. पण! "शिवशंभू" चरित्राचं कर्तृत्वं ऐकण्यासाठी आपण मोठ्या संख्येनं एकवटतो एवढी एकचं गोष्ट तुमच्या आमच्या काळजामध्ये "राजा शिवशंभू" अजूनही जिवंत आहेत. याचीच ती साक्षं.

"इथल्या मातीचा एखादा ढेकूळं कधी हातात घेतला तो पाण्यात टाकला,तरं पाण्यावरं जो तवंग उठेल तो तवंग सुद्धा या मातीसाठी खर्ची पडलेल्या मावळ्यांच्या रक्ताचा असेल". आजूबाजूच्या सह्याद्रीची उंची वाढली ती उगाच नाही,"या सह्याद्रीच्या पायाखाली काहीजणांनी स्वतःला गाडून घेतलयं तेव्हा तो सह्याद्री आसमानाशी स्पर्धा करायला गेला!"

या सह्याद्रीची सैरं करणं कोणा ऐऱ्याचं गैऱ्याचं काम नाही, सह्याद्रीची सैरं फक्तं तीघचं करू शकतात. पहिला"वाघ",दुसरा"वारा" आणि तिसरे"मराठे"!!! या तिघांशिवाय सह्याद्री पेलनं कुणाला जमलं नाही साधलं नाही. या सह्याद्रीच्या कुशीत पुन्हा कचरीलाचा जन्मं कधी झालाचं नाही. इथं जन्माला आले ते "शिवराय" आणि "शंभूराय". ३५० वर्षापूर्वीचा जागरं आजही घडतोय इथं. "छत्रपती शिवाजी महाराजांचं" नाव कानांवर पडतं आणि आमच्या शरीरावरं रोमांच उठतात, "छत्रपती शिवाजी महाराज कि जय" अशी किल्कारी कुठं निनादते आणि आमचं शरीरं पेटून उठतं. मनमनांमध्ये उर्मिजाप, निर्णाजाय, प्रेरणास्त्रोत तयार होतो. अरे! ३५० वर्ष झाली या राजाला आम्ही विसरू शकतं नाही. अरे! दूरवरं कुठेतरी किल्कारी ऐकू येते "छत्रपती शिवाजी महाराज कि" आणि आमच्या ओठातून कधी "जय" बाहेर पडतं आमचं आम्हाला कळतं नाही. जणू काय आमच्या धमन्यांतून सळसळनाऱ्या रक्ताच्या थेंबा-थेंबामध्ये तो "राजा शिवाजी" अजूनही जिवंत आहे. जणू काय इथल्या मातीमध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्तेक पोराच्या भाळावरं इथली माती जन्मतःचं "शिवाजी" हे नाव कोरूनचं त्याला जन्माला घेते कि काय असं सांगावं इतकी जादू या राजाची आहे. असं काय केलं असेल या राजानं!!! असं काय निर्माण करून ठेवलं असेल!!!

३५० वर्षानंतर जर शिवरायांचं नाव घेऊन आमचं शरीरं पेटतं असेलं, ३५० वर्षानंतर जर शिवरायांचं नाव घेऊन आम्हाला स्फूरणं चढतं असेलं तर ३५० वर्षापूर्वी खुद्द "शिवछत्रपतींच्या" कुशीत जन्माला आलेला "संभाजी राजा" कसा असेलं !!!

अरे! कसा घडला असेलं!...कसा उभा राहिला असेलं!...कसं असेलं शौर्य!...कसं असेलं धैर्य!...कसं असेलं धाडसं!...कसं असेलं साहसं!...कसा असेलं अभिमान!...कसा असेलं स्वाभिमान!...कसा असेलं पराक्रम!

कसं असेलं नेतृत्वं, व्यक्तीत्वं, कर्तृत्वं!!!

कसा असेलं......""संभाजी""

शंभूचरित्र भाग ०२ ( वाचा आणि शेअरं करा )

ज्यावेळी कोणा एखाद्या गावरान माणसाला प्रश्नं विचारला जातो..."संभाजी राजे कसे होते तुम्हाला माहितीये का?" तो दोन शब्दांत उत्तरं देतो. "संभाजी महाराज रगेल होते" आणि "संभाजी महाराज रंगेल होते". दोन शब्दांत "संभाजी राजांचा" इतिहास बदलून जातो. इतिहासानं ना-ना आरोपांच्या फायरी झाडल्या त्यांच्यावरं. "संभाजी स्वर्याचारी, संभाजी रगेल, संभाजी रंगेल, संभाजी राजाने मराठेशाही बुडवली, संभाजी राजे म्हणजे शिवछत्रपतींच्या पोटाला आलेला नादान तख्तनंशील वारीस, संभाजी राजे म्हणजे स्वराज्यद्रोही, संभाजी राजे म्हणजे मुघलांच्या गोठात जाऊन मिळालेले, संभाजी राजे म्हणजे छत्रपतींचे पुत्रं असूनं युवराज असूनं मोघलांना सामील झालेले". ना-ना, ना-ना, ना-ना आरोपांच्या फायरी झाडल्या. बदनाम होत राहिला "संभाजी" गेली ३५० वर्ष. काय वस्तूस्थिती? काय खरा इतिहास?

इतिहासाची पानं ज्यावेळी चाळतो, पुरावे पाहतो, त्यावेळी लक्षात येतं १४ मे १६५७ पुरंदरवरं एका "शिवरत्नाचा" जन्मं झाला आणि आपल्या ज्येष्ठ पुत्राची याद म्हणून "माँसाहेब" जिजाऊनी त्यांचं नामकरणं केलं. बघता बघता संभाजींच्या बाललीलांनी सर्वांची मनं हरपू लागली. वय झाल सव्वा दोन वर्ष आणि त्याच वेळी नियतीनं गलती केली. संभाजी राजांच्या "मातोश्री सईबाई महाराणी साहेब" यांचं निधनं झालं. दहिवरचं मातृत्वाचं छत्रं हरपलं. पिता "शिवाजी राजे" तर सतत पाठीला मरण बांधून मुलुखभर दौड घेणारे,पित्याची छत्रछाया वाट्याला यावी कशी? पण! याचवेळी सामन्याला "माँसाहेब" जिजाऊ. अजून दुसरा "शिवाजी" घडवायचं सामर्थ्य जिजाऊत नक्कीच आहे. आणि जिजाऊ नावाच्या चालत्या बोलत्या विद्यापिठामध्ये "संभाजी" राजांचं शिक्षण चालू झालं. संभाजी राजे "लिहिणं-वाचणं शिकले", "चालणं-बोलणं शिकले", "पळणं-खेळणं शिकले". बघता बघता ना-ना कला, ना-ना विद्या, ना-ना गुण त्यांना आत्मसाद झाले. एक नाही, दोन नाही, तीन नाही, चार नाही तब्बल सोळा-सोळा भाषा संभाजी राजांना यायला लागल्या. मराठी येते, उर्दू येते, फारसी येते, कानडी येते, तामिळ येते, मल्ल्याळ येते, हिब्रू येते, पाली येते, संस्कृत सुद्धा संभाजी राजांना येतेय.

राज्यशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, प्रभागशास्त्र या सगळ्या शास्त्रांमध्ये संभाजीराजे तेज तरबेज झाले. काव्यगुण सुद्धा त्यांनी जोपासला. संभाजी राजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी "बुधभूषणम्" नावाचा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला. या "बुधभूषणम्" नावाच्या ग्रंथामध्ये संभाजीराजे "श्री गणेशाचं" वर्णन करताना लिहितात,

"पदपदम् पत्रं समचरणंजंग जिमीकलक् कलवकर् ....!!!

नाभीलालित् कबीरउदरलंबित विशालंवर् ....!!!

वरंदिर्घतिमुण्डी करंदेत् चारीफ़ल्....!!!

एकदन्तरुसुण्ड् लवतरिजत् सकलंमल्....!!!"

हे संभाजी राजांनी संस्कृत मधून "श्री गणेशाचं" केलेलं वर्णन आहे. 'नकशिका', 'नायिकाभेद', 'सातसतर्क' यांसारखे कैक ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केले. आणि बघता बघता उत्तमं कवी म्हणून "संभाजी राजांचा" नावलौकिक झाला. बुद्धीचं कार्यक्षेत्र तर काबीज केलंच पण! त्याचवेळी शरीराचं, शरीरसंपदेचं, हा संभाजी ना-ना विद्यामध्ये, व्यायामामध्ये तेज तरबेज झाला. "मल्लविद्या",

"भालाफेक", "तलवारबाजी", "घोडेस्वारी" याच्यामध्ये संभाजी राजांनी मोठी हुकुमत पैदा केली. अरे! घोडेस्वारीमध्ये संभाजी राजांचा हात कोणी धरतं न्हवतं. तत्कालीन काळामध्ये पळत्या घोड्याला एका पायावर उभा करणारा आणि गर्रदिशी डोळ्याची पापणी मिटते तोवर फिरवणारा या जगाच्या पाठीवर एकचं योध्दा झाला. त्या योद्ध्याचं नाव होतं...."“संभाजी""

शंभूचरित्र भाग ०३ ( वाचा आणि शेअरं करा )

संभाजी राजांसारखी झेप बाकी कुणाला जमलीच नाही. बघता बघता संभाजींच्या या कर्तुत्व गुणांनी "स्वराज्य" मोहरत निघालं. संभाजी राजांचं येणं जणू स्वराज्याला भाग्यशाली ठरलं. संभाजी राजांचा जन्मं झाला आणि स्वराज्य वाढत-वाढत निघालं. प्रतिपदेच्या चंद्राच्या कलेकले प्रमाणं स्वराज्य संवर्धीत होत गेलं. बघता बघता साडे आठ वर्षाचे झाले संभाजी राजे. त्याचवेळी महाराष्ट्रावर "मिरझाराजे जयसिंगच" आगमन झालं आणि छत्रपती शिवरायांना नाईलाजानं तह करावा लागला. पुरंदरंसह तेवीस किल्ले बहाल करावे लागले आणि त्याच वक्ती मीरझा म्हणाला.."राजे! आपले पुत्रं संभाजी राजे आमच्याकडे ओलीस म्हणून राहतील..." नरसिंह व्याकुळला.."नाही राजे, हे राजकारणं नव्हे!" आणि मीरझा हसतं म्हणाला,"राजे! हे राजकारणंच आहे" आणि वयाच्या साडे आठव्या वर्षी संभाजी मोघालांकडे ओलीस म्हणून राहिले. आणि त्याचवेळी संभाजींचा राजकारण प्रवेश झाला. यताकाल शिवरायांनी मनसबी पत्करल्या, औरंगजेबानं मनसबी धाडल्या. शिवरायांना पंच हजारी मनसबदार तर संभाजी राजांना सप्त हजारी मनसबदार केलं. पित्यापेक्षा पुत्राला मनसब अधिक दिली जणू औरंगजेबाला कळून चुकलं होतं "पित्यापेक्षा पुत्रं सवाईचं निपजणारं आहे". त्याचवेळी औरंगजेबाचा खलिता आला, "शिवरायांना आग्र्यास बोलावलयं सोबत मनसबदार म्हणून संभाजी राजानाही न्यायचय". एका पित्याचं काळीज व्याकूळलं, अरे! नऊ वर्षाचं पोरं आहे,इवलासा पोरं आहे, कसं न्यावं त्याला. या मुलुखापासून त्या मुलुखापर्यंत वैराण वनवास भोगेल का त्याला? अरे! ऊन, वारा, वादळं, पाऊसं या प्रवासात कसा टिकेल? कसा जगेल? मग! त्याचवेळी शिवरायांच्या लक्षात आलं, अरे! संभाजी म्हणजे एकतरं शिवाजीच्या पोटाला आलेला पोरं नाही, "तो सह्याद्रीच्या कुशीत आणि महाराष्ट्राच्या मुशीत जन्माला आलेला मराठ्याचा पोरं आहे". ते धैर्य ते शौर्य त्याच्यातही आहेच. आणि शिवरायांनी त्यांना सोबत घेतलं. या मुलूखापासून आग्रा मथुरेपर्यंतच्या मुलूखापर्यंतचा सगळा प्रवास संभाजी राजांनी लीलयात झेलला. "राजे" आणि "संभाजी राजे" औरंगजेबाच्या दरबारात हजर झाले. पण! इथचं औरंगजेबाने गहरी चाल खेळली. शिवरायांना मागच्या रांगेत उभं केलं आणि महाराष्ट्राचा "नरंसिंह" खवळला आणि बघता बघता बाणेदारपणे भर दरबारात औरंगजेबाला फटकारून उभा राहिला. सगळा दरबार कापतं राहिला. एवढा-एवढा-एवढा स्वाभिमान अरे! आत्तापर्यंत दिल्लीपतीची अशी नामुष्की कुणी केली न्हवती, असा अपमान कधी घडला न्हवता आणि या शिवरायांनी औरंगजेबाला भर दरबारामध्ये फटकारावं,उभा दरबार थरं- थरं कापतं होता. अरे!!! चुकूनं जरं शिवरायांकडे तलवार असती ना त्यावेळी तरं तिथंच औरंगजेबाचा यदाकदाचित शिरंच्छेद सुद्धा झाला असता. मोघलांच्या दरबारात जाऊन मोघलांची दाणादाण शिवरायांनी उडवली आणि फटकारून सरळ चालते झाले. औरंगजेबाने समझौतीचा प्रयत्नं केला पण! राजा बदला नाही आणि त्याच वेळी औरंगजेबानं जहरी चाल खेळली.

शिवरायांच्या भोवतीचे पहारे कडक केले आणि बघता बघता शिवरायांच्या गळ्याभोवतीचा फास आवळायला सुरवात केली. शिवरायांना कळून चुकलं होतं औरंगजेबाच्या मगरमिठीतून सुटका नाही आणि त्याच वेळी शिवरायांच्या लक्षात आलं कि, सगळ्याच लढाया तलवारीच्या बळावरं नाही खेळल्या जात काही लढाया बुद्धीच्या बळावरं सुद्धा खेळाव्या लागतात.

"तलवारीच्या पात्याला एकदा का बुद्धीची धारं चिकटली कि मगं शौर्य लखलखतं आणि बघता बघता शिवरायांच्या तलवारीला बुद्धीची धार चिकटली आणि चाल आखली जाऊ लागली.

शंभू चरित्रं भाग ०४

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबाला भर दरबारात मराठी मातीचा दणका दाखवल्यानंतर त्या दिवसापासून "शिवराय" औरंगजेबाच्या दरबारात कधी गेले न्हवते.पण! शिवरायांचे प्रतिनिधी म्हणून "संभाजीराजे" मात्रं औरंगजेबाच्या दरबारात येत जात असत. एके दिवशी भर दरबारात औरंगजेबानी संभाजी राजांना विचारलं, "राजे!!! आपण उत्तमं मल्लविद्या जाणता असं आम्ही ऐकून आहे. आपण उत्तमं कुस्ती खेळता असाही आम्ही ऐकलयं. मगं! संभाजी राजे!!! आमच्या दरबारात सुद्धा चांगले चांगले मल्ल आहेत. आमच्या दरबारातल्या एखाद्या माल्लाशी कुस्ती खेळल का? तसा नऊ वर्षाचा छावा कडाडला...." आम्ही फक्तं आमच्या लायकीच्या माल्लांशीच कुस्ती खेळतो आणि तुझ्या दरबारात माझ्या लायकीचा एकही मल्ल नाही...सबब!!!"

हे महाराष्ट्राचं पाणी होतं. महाराष्ट्राचा स्वाभिमान संभाजी राजांनी वयाच्या नवव्या वर्षीच औरंगजेबाला दाखवला. पण! बघता बघता औरंगजेबाची मुठी आवळत गेली, शिवरायांचा गळा गुदमरू लागला आणि त्याचवेळी शिवरायांना बाहेर पडायला मुभा नाही. पण! संभाजीराजे मात्रं औरंगजेबाच्या महालापासून ते कुंभाराच्या वड्यापर्यंत बिंदोख येत जात होते. या सगळ्या सुटकेच्या चालीच्या सगळ्या जबाबदाऱ्या शिवरायांनी संभाजी राजांवर सोपविल्या आणि महालापासून कुंभाराच्या वड्यापर्यंत सगळी चाल संभाजी राजानं व्यवस्थित पेरली. आणि बघता बघता दिवस उजाडला जे स्वप्नांतही शक्यं होणारं नाही ते शिवरायांनी सत्यात उतरवलं आणि "महाराष्ट्राचा नरसिंह" सुटला. औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटला.

पण! आपला एकुलता एक पोरं "संभाजी" त्याला मागं ठेवून त्यावेळी एका पित्याचं काळीज गलबलंल नसेल का? जीव व्याकुळला नसेल का? अरे! नऊ वर्ष उमरीच पोरं कसं ठेवावं मागं, मृत्युच्या दारात, औरंगजेबाच्या दरबारात अरे!!! कसं ठेवावं. जरं जातेवेळी त्या संभाजी राजानं विचारलं असतं शिवरायांना, "आबासाहेब..आम्हाला सोडून एकटेचं जाणार?" अरे! तरी हा सुद्धा हटला असता मागं, धरणी कंपच झाला असता, फाटला असता बांध जरं विचारलं असतं संभाजीनी "आबासाहेब आम्हाला सोडून एकटेचं जाणार!!!". पण त्यावेळी हा "सर्जा संभाजी राजा" आपल्या पित्याचा हात हातात घेऊन सांगत होता, "आबासाहेब..आमची फिकीर करू नका, आमच्यापेक्षा महाराष्ट्राला आपली गरज अधिक आहे" आणि आपल्या पोराच्या परिपक्वतेवरं हा "नरसिंह" खुश झाला. यताकाल राजे निसटले आणि राजगडावर पोहोचले आणि पोहोचल्या पोहोचल्या त्यांनी वार्ता उठवली "वाटेत संभाजी राजांचं निधनं झालं". वयाच्या नवव्या वर्षी संभाजी राजांच्या पाठीला जे मरण बांधलं गेलं ते इंद्रायणी भीमेच्या तीरावरं मरणा निधड्या छातीनं सामोरं जायीपर्यंत ते मरण तशीच त्यांची सोबत करत राहिलं. पण! शिवरायांनी उठवली होती हुलं. राजगडावर तर संभाजींचे अंत्यविधी सुद्धा झाले. येसूबाई सती जायला निघाल्या. जिजाऊ तरं रडून रडून थकल्या पण! सगळी चाल शिवाजींनी आपल्या काळजात मिटून ठेवली तोपर्यंत जोपर्यंत संभाजी राजे सुखरूप गडावर येत नाहीत. हुलं उठवली एवढ्यासाठी कि संभाजींच्या मृत्यूची बातमी औरंगजेबाला कळेल आणि औरंगजेब त्यांचा

पाठलाग सोडेल आणि मग सुरक्षित संभाजी राजे गडावर येतील आणि झालं तसचं संभाजी राजे सुरक्षित गडावर पोहोचले पण गेलेला शंभूराजा वेगळा होता आणि परत आलेला संभाजी राजा वेगळा होता. परत आला होता "धाकंला धनी","जाणता","परीपक्वं झालेला","मोघली रियासतीचा","राजकारणाचा" अभ्यास करून तयार झालेला......"संभाजी राजा"

शंभू चरित्रं भाग ०५ (वाचा आणि शेअरं करा)

"संभाजी राजांचं" वयं झालं दहा वर्ष. त्याचवेळी शिवाजीराजांनी संभाजी राजांना विचारलं, "संभाजी राजे आपण लेखणी तेज चालवता पण! आपली तलवारं?" अरे! उसळला छावा......"आज्ञा द्यावी आबासाहेब!!!" आणि आज्ञा दिली गुजरात खंबायप्रांत टिपण्याची आणि दहा हजाराची फौज घेऊनं बछड निघालं. दावेचा लोट काळ्या कबिनं धाकानं उरातं घ्यावा तसा शौर्याचा लोट घेऊन निघाला. कोसळला गुजरातवरं खंबाय टिपलं, बागानगर लुटलं, मामे जाधवरावं खासे कैद केले आणि स्वतःच्या शौर्याची मोहरं स्वराज्यावरं उमटवली आणि त्यांच्या युद्धनीतीनं अनेकांच्या नजरा विस्पारून गेल्या. शिवरायांना बातमी कळाली आणि कडाडले शिवराय..."द्या बत्ती तोफांना, आमचा बछडा जीत घेऊन रायगड जवळं करतोय!" आणि स्वराज्यावरं संभाजींचा पहिला पराक्रमं उमटला.

लेखणीच्या, बुद्धीच्याचं बळावरं न्हवे तरं मनगटांच्या परीक्षेत सुद्धा संभाजी राजे अव्वलं आले. यताकाल जिजाऊ माँसाहेबांनी मुलखी प्रशासनाच्या सगळ्या जबाबदाऱ्या संभाजी राजांवर सोपवल्या. दानंप्रमुख म्हणून त्यांना जबाबदारी दिली. मंत्र्यांच्या वरच्या ज्या तक्रारी यायच्या त्याचं निराकनं करण्याची जबाबदारी सुद्धा संभाजी राजांवर सोपविली. एवढचं न्हवे धर्माच्या बाबतीत जे जे खटले शिवरायांच्या न्यायालयापुढे यायचे ते सगळे खटले शिवराय आता "धर्मपंडित" असणाऱ्या संभाजी राजांच्या न्यायासनापुढं चालवायला देऊ लागले आणि संभाजी राजांच्या धर्माचे खटले बघता बघता त्यांचे न्याय लोकांमध्ये प्रियं होऊ लागले. "न्यायकठोरं संभाजी" म्हणून संभाजींची लोकप्रियताही वाढली. जनतेच्या कल्याणाचं सूत्रं संभाजी राजांनी आपल्या काळजात जपलं कारणं! शिवरायांनी दिला होता महामंत्र,""रयतेच्या डोळ्यातला एक अश्रूही राजाला एका बलवान शत्रूपेक्षा भारी वाटतो...एकवेळ शत्रूनं पराभव केला तरी चालेल पण! रयतेच्या डोळ्यातल्या अश्रूंनी राजाचा पराभव होता कामा नये""

आणि संभाजीराजे त्याचं शिवरायांच्या पाऊलावर पाऊल टाकून रयत जपत होते. अगदी मार्दवतेनं, पोटच्या लेकासारखे.

शं भू चरं भाग ०६

(वाचा आणि शेअरं करा)

यताकाल संभाजी राजाचं वयं होतं सतरा वर्ष. महाराष्ट्र एका नव्या जाणीवेच्या आनंदाला आतुरं झाला. रायगड आनंदानं न्हाला होता. कारण होतं "शिवरायांचा राज्याभिषेक". साडेसातशे वर्षापूर्वीचा घनदाट अंधार हटवून राजे "छत्रपती" होणारं होते. "या म्लेंच्छ बादशाहीमध्ये एक 'मराठा' एवढा पातशहा झाला" हि गोष्ट काही साधी झाली नाही. असं सभासदांनी लिहून ठेवलं. तो देखणा सोहळा शिवरायं "छत्रपती" होणारं. पण! त्याचं वेळी काहींनी शिवरायांच्या क्षत्रियत्वावरंच आक्षेप घेतला. शिवरायं क्षत्रीयं नाहीत. सबब! त्यांना राज्याभिषेकाचा अधिकारं नाही. यताकाल "गागाभट्ट" काशीवरून येते झाले आणि त्यांच्या सामोरं बसले. "धर्मपंडित" संभाजी राजेंनी "गागाभट्टाना" पटवून दिलं. गागाभट्टानी संमती दर्शवली आणि रायगडावर राज्याभिषेक झाला. साडेसातशे वर्षापूर्वीचा अंधार हटवला, लोकंशाही राज्यं निर्माण झालं, लोकंकल्याणकारी राज्यं निर्माण झालं, शिवंकल्याणकारी राज्यं निर्माण झालं, शिवशाही अवतरली. रयतेच्या डोळ्यांच्या कडा आनंदानं पाणावल्या. राजा "छत्रपती" झाला. पण! त्याचवेळी इतिहासात आणखी एक घटना घडली, आत्तापर्यंत मराठ्यांची पोरं फक्त सरदारं पुत्रं होती. "संभाजी राजे पहिले 'छत्रपती' पुत्रं ठरले", "संभाजी राजे पहिले 'युवराज' झाले.

या घटनेपर्यंत संभाजी राजांवर एकही आरोप नाही, एकही डाग नाही. पण! या घटनेनंतर संभाजी राजांच्या चारित्र्याचं पाणी असं काही वेगळ्या पाटेनं वळवून देण्यात आलं कि, मुळचा "संभाजी राजाच" हरवून गेला. 'मल्हारं रामराव चिटणीस' या बखरकारानं आपल्या खापरं पंजोबाला संभाजीनी हत्तीच्या पायी दिलं याचा राग मनात घेऊन "संभाजी राजांचं" अत्यंत विकृत चित्रणं केलं. सभासद बाखरानही तसंच केलं. या दोन बखरींचा आधार घेऊनच मग! पुढचं लेखन झालं आणि "संभाजी राजा" बदनाम होत राहिला. संभाजी राजांवर आत्तापर्यंत ६० नाटकं, आणि २७ चित्रपटं आले. खुद्द दस्तूरं खुद्द शिवरायांवर सुद्धा एवढे झाले नाहीत. आम्हाला चकचकीत जगण्याची सवयं लागलीये. चित्रपट निर्मात्यांनी, नाट्य निर्मात्यांनी, कादंबरीकारांनी, संभाजी राजाचं जगणं वास्तवतेनं न रेखाटता ते अधिक चकचकीत करण्याचा प्रयत्नं केला. थोरातांची कमळा, मोहित्यांची मंजुळा, गोदावरी अशी काय पात्रं आणली गेली "मोरेश्वरं आत्माराम पठारे" यांनी संभाजीवर पाहिलं नाटकं लिहिलं. या नाटकामध्ये त्यांनी तुळसा नावाचं पात्रं आणलं हीच तुळसा बेबंदशाही मध्ये औंधकरांनी आणली पण! नाटकाच्या प्रस्थावनेमध्ये औंधकर असं लिहितात कि या नाटकात योजलेलं "तुळसा" नावाचं पात्रं पूर्णपणे काल्पनिक असून तिचा इतिहासाशी काडीमात्र संबंध नाही. पण! तीन तास नाटकं बघताना आम्हाला प्रस्थावना वाचून दाखवली जात नाही, "तुळसा" खरी का खोटी याचा पत्ता आम्हाला लागतं नाही. पण! तीन तास नाटकात संभाजीबरोबर तुळसा दिसते आणि मग! नाटक संपल्यावर आम्ही म्हणतो, "एवढे आता दोघं तीन तास होते बरोबर म्हटंल्यावर असणार काहीतरी दोघांच.".....उगं दाखवत्यात काय!!!

सत्याच्या तळाशी, वास्तवाच्या मुळाशी आम्ही जात नाही आणि मग एखादं "नाहक व्यक्तीमत्वं" बदनाम होत राहतं हि आमची सगळ्यात मोठी शोकांतिका आहे.

शंभू चरित्रं भाग ०७

(वाचा आणि शेअरं करा)

चित्रपटं काही बघितले आम्ही "थोरातांची कमळा", "मोहित्यांची मंजुळा" काय दाखवलं? "थोरातांच्या कमळा"मध्ये, "संभाजी राजे" या थोरातांच्या कमळावर जबरदस्ती करतात. तो आघात सहन न झाल्यामुळे थोरातांची कमळा "आत्महत्या" करते. चित्रपटाच्या शेवटी ती समाधी सुद्धा दाखवली आहे. पण! निवेदन आहे, हि त्या थोरातांच्या कमळाची समाधी निदान त्याच्यावरं काय लिहीलंय ते बघावं तरी! काय लिहीलंय ते वाचलं आश्चर्याचा धक्का बसला......!!! थोरातांच्या कमळाचं निधन पावल्याचं सालं होतं "१६९८ सालं" आणि संभाजी राजाचं निधन झालायं "१६८९ साली" म्हणजे संभाजी राजांच्या मृत्युनंतर नऊ वर्षांनी थोरातांची कमळा मेली. मग! तीच्यावरं जबरदस्ती करायला "संभाजी राजांच" भूत गेलं होत का?

अजूनही प्रश्नं नाही पडला आम्हाला. ३५० वर्षे झाली उघड्या डोळ्यांनी आमच्या राजाची बदनामी बघत बसतो आम्ही उघड्या डोळ्यांनी. अरे! शिव छत्रपतींचा पुत्रं आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून आईच्या मानाने माघारी पाठवली त्या त्या राजाचा पुत्रं आहे. अरे! तत्कालीन काळात कईक स्त्रियांचा राणीवास असणं काही गैरं न्हवतं, ना कक्षाळा ठेवणं समाज संमत होतं. किती आहेत संभाजी राजांच्या चरित्रात, दोन नावं आढळतात "दुर्गाबाई" त्याही कैदेत आणि राहिल्या फक्तं "येसूबाई"..."स्त्री सखी राज्ञी जयती" महाराणी येसूबाई यांच्याशिवाय चरित्रातं नावं आढळत नाही कुणाचं. का? स्वतः संभाजी राजांनी राजारामाची तीन लग्नं केली, संभाजी राजांनी सहा तरी करावी.

अरे! तो अकबरं औरंगजेबाचा मुलगा महाराष्ट्रात आलाय संभाजींची मदत मागायला आणि त्याला मैत्रीचं प्रतीकं म्हणून संभाजी राजांनी "मोत्याचा कंठा" भेट म्हणून दिला. आणि या नादान अकबरानं तो "मोत्याचा कंठा" एका नर्तकीला भेट म्हणून दिला. संभाजी राजांना हि वार्ता कळली आणि धाडदिशी कडाडले संभाजी राजे, "ज्याला मैत्रीची कदरं नाही त्याच्याशी कसंलही पत्रं आम्हाला जोडायचं नाही, फिल्तोर सवलती बंद करा...!" का? तरं मी दिलेला मैत्रीचा कंठा त्या अकबरानं नर्तकीला दिला.

एवढी साधी गोष्ट ज्या "सर्जा संभाजी राजाला" सहन होत नाही तो चारित्र्याच्या बाबतीतं कसा असेल. बाजार गप्पा आहेत सगळ्या बाजार गप्पा...!!!

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ०८

(वाचा आणि शेअरं करा)

"संभाजी महाराज" व्यसनी असं रेखटलंय काहींनी. काही काही नाटकात तरं इंट्रीच ग्लास घेऊन दाखवली. अरे! कुठून लागला शोधं?

काफिखान तो औरंगजेबाच्या दरबारात होता अख्बारी. आपल्या सातारंला "ग्रांन्डफ" नावाचा इतिहासकार होता. त्याने मराठ्यांचा इतिहास लिहीला. आधार त्या काफिखानाचा घेतला. त्या काफिखानानं "संभाजी राजांच" वर्णन करताना लिहून ठेवलयं, ""तो संभाजी स्वतःच्या बळावरं, शौर्याच्या बळावरं एवढा बुलंद आणि बलाढ्य झालायं कि कुणी शत्रू त्याच्यावरं आक्रमणं करायला धजावेनाच...! जणू संभाजी राजाला आता सत्तेची नशा चढलीए"" काय लिहीतोय तो? " संभाजी स्वतःच्या शौर्याच्या बळावरं एवढा बुलंद आणि बलाढ्य झालायं कि कोणी शत्रू त्याच्यावरं आक्रमणं करायला धजावेनाच जणू काय त्याला सत्तेची नशा चढलीए" याचंच भाषांतर "ग्रांन्डफ" नि इंग्रजीत केलंय "सत्तेची नशा चढलेला राजा"......"Antoxited With The Wine Of Volian Pride" भाषांतर अगदी बरोबर आहे. पण! आमचं इंग्रजी उत्तमं आहे त्यामुळं आम्ही वाचलं.

"Antoxited With The Wine Of Volian Pride"........"Antoxited With The Wine ??...Wine?? घेत होते संभाजी!!! लावला अनुमान.

एक पत्रं मिळालंय म्हणे, संभाजीराजांनी पोर्तुगीजांना पाठवलंय!!!......"आम्हाला दारूची दोन पिंप द्या". एकजण म्हंटला "मागवला असेलं Stock" अरे! कायं???......अरे!!! मागवलेली दारू प्यायची नाही, मागवलेली दारू तोफेला लागणारी दारू आहे. एवढं जरं तुम्हा लिहीणाऱ्या कळंत नसेल तरं तुम्ही लिहीताना घेतलेली का? याचं संशोधनं होणं गरजेचं आहे. सुपारीच्या खांडाचं व्यसनं नाही संभाजी राजाला......सुपारीच्या खांडाचं!!!...अरे!!! बत्तीस वर्ष झुंजत राहिलाय "छाव्यासारखा".

अजीबात नाही व्यसनी माणसाला नाही शक्यं होत. अरे! बेफाम अत्याचारं,अन्यायं सोसले. चाळीस दिवस औरंगजेबाच्या छावणीत!!! सहन होत नाही, शरीरंसंपदा तशी असावी लागते. आपल्या राजानं ती कमावलीये!!!...कमावलीये!!!. एकंही व्यसनं नाही त्याला एकंही.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ०९

(वाचा आणि शेअरं करा)

आणखी काही आरोप केले गेले "संभाजी राजांवर". "संभाजी राजे" दीलेरंखानाला जाऊन मिळाले, संभाजीराजे फुटीर, छत्रपतींचा पुत्रं मोघलांना सामील......

नाही, "शिवाजीराजे" कर्नाटकच्या स्वारीवरं निघालेत, सगळं सैन्यं त्यांच्या सोबतं आहे. त्यावेळी बहादूरगडाला दीलेरंखान आलाय, तो स्वराज्यावरं आक्रमणं करायची भीती आहे. महाराजांनी "आदिलशाही" आणि "गोवळकोंड्यात" भांडणं लावून दिलीतं. त्यामुळे ते स्वराज्यावरं आक्रमणं करणारं नाहीतं. पण! दीलेरंखान मोकळा आहे. आपण कर्नाटकात निघाल्यावरं दीलेरंखान आक्रमणं करू नये यासाठी त्याला रोखण्याची जबाबदारी शिवरायांनी "संभाजी राजांना" दिलीये. त्यांना "शृंगारपुरचं" सुभेदारं म्हणून नेमलंय. आणि ससैन्यं शिवरायं बाहेरं असताना निव्वळं बुद्धीच्या बळावरं "संभाजी राजांनी" दीलेरंखानाला रोखलंय,राजे येईपर्यंत रोखलंय. आणि त्यावेळी पत्रंव्यवहारं केलायं..."आम्हाला पराक्रमाची संधी हवीयं, आम्हाला आमचा पराक्रमं दाखवायचायं, इथं स्वराज्यातं ते शक्यं होईना, मला संधी द्यावी!!!". दीलेरंखानाने लगेचं उलट टपाली पत्रं पाठवलं..."अरे! तू तिथं गप्पं काय बसलायं? औरंगजेबाची इच्छा आहे सह्याद्री जिंकायची, तू ये चंल ये माझ्याकडं. आपण दोघं मिळून सगळा दख्खनं जिंकू". संभाजी राजांनी त्याला उलट टपाली कळवलं, "या राज्याची जबाबदारी मझ्यावरं सोपवून माझे वडील परराज्यात गेले आहेत. ते परत येईपर्यंत मी तुझी जबाबदारी स्वीकारुं शकतं नाही". म्हणजे संभाजीराजे येतोही म्हणत नाही आणि संभाजीराजे येत नाही असंही म्हणत नाही. निव्वळं झूलवतं ठेवलंय. राजे परत आले. पन्हाळ्यावर दोघांची चर्चा झाली, बुत झालं आणि मग! राजे रायगडावर गेले. यताकाळं निरोप पाठवू सांगून मध्ये सहा-सात महिने गेले. आता संभाजीराजांना पळूनचं जायचं होतं तर राजे कर्नाटकात असतानाच ते सोपं होतं. आणि मग! एके दिवशी रायगडावरून राजाचं पत्रं येतयं. आपण रायगडास न येता परळीस जाने उचित. आणि मग! संभाजी राजे निघाले तिथून आता परळी म्हटंल कि पुन्हा " समर्थ रामदास स्वामींचा" उल्लेख आला. ""मग! संभाजी राजे बिघडलेले होते, त्यांना मार्गदर्शनाची गरजं होती म्हणून शिवरायांनी त्यांना समर्थांकडे पाठवलं"". पण! त्या क्षणी समर्थ परळीच्या किल्ल्यावर हजरंच न्हवते आणि राजांना हे माहिती

असंलचं पाहिजे,कानोकान खबरी असतात त्यांच्याकडं. मग! ज्या काळात समर्थ परळीच्या किल्ल्यावर नाहीत त्याच काळात संभाजीना तिथं पाठवायचा उद्देश्य काय? आणि परळीपासून तेरा मैलावरं माहुलीला दीलेरंखानची लोकं आलीत तिथून अवघ्या तेरा मैलावरं जाऊन संभाजीराजे मोघलांना सामील झाले. हा सगळा परिक्रमेचा भाग बघितला तर संभाजी राजांनी पाळूनच जावं यासाठी हे जाणीवपूर्वक केलेलं नियोजन आहे. कारण! वस्तूस्थिती ती आहे, शिवाजी राजे कर्नाटकावरून परत आलेत, सैन्यं थकलंय, शस्त्रं मोडलीत, दीलेरंखानाशी लगेच मुकाबला करू शकत नाही यासाठी आणखी काळं दीलेरंखानाला रोखनं गरजेचं आहे म्हणून शिवरायांनी संभाजी राजांना सांगितलंय...."“जा त्यांच्याकडं रोखून धरा"" आणि हीच चाल शिवाजीराजांनी आधी एकदा खेळली आग्र्याच्या भेटीवरून परत आल्यावरं. औरंगजेब आता हल्ला करणार हे बघितल्याबरोबर शिवरायांनी पुन्हा माफीचं पत्रं पाठवलंय, "आमच्याकडून चूक झाली, आम्ही तुम्हाला न सांगता आलो...असुद्या! आता माझा पुत्रं पुन्हा मनसबदारं म्हणून घ्या". आणि संभाजींना पुन्हा त्यांनी मुआजमकडं पाठवलंय आणि तेच याहीवेळी केलं संभाजींना त्यांनी पुन्हा दीलेरंखानाकडे पाठवलंय आणि जेवढा काळं संभाजी दीलेरंखानाकडे आहेत तेवढा काळं दीलेरंखानानं एकदाही स्वराज्यावरं हल्ला केला नाही. ""भूपाळगडाचा एकंच किस्सा पण! त्या भूपाळ गडाबद्दल संभाजी राजे बाकरे नावाच्या ब्राम्हणाला दानंपत्रात ते स्वतः लिहितात...."तो दीलेरं भूपाळगडाची इच्छा धरूनं माझ्यासमोरं आला त्यावेळी शंकरासारखा मी माझा तिसरा नेत्रं उभारूनं क्रोधं प्रकटं केला". म्हणजे सरळं आहे संभाजी राजांची इच्छा नाही स्वराज्यावरं आक्रमणं करायची. एवढी एकचं घटना". पण! तोही गड मराठ्यांनी लगेच जिंकून घेतलाय. संभाजीराजे जोपर्यंत दीलेरंखानाकडे आहेत तोपर्यंत दीलेरंखानाने स्वराज्यावरं आक्रमणं केलेलं नाही आणि संभाजींनी ते जाणीवपूर्वक होऊ दिलं नाही. पण! याच काळात शिवाजीराजे मात्रं मोघालांचे किल्ले घेत निघाले.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १०

(वाचा आणि शेअरं करा)

"शिवाजीराजे" मोघालांचे किल्ले घेत निघाले असताना, दीलेरंखान काहीच हालचाल करेना म्हणजे त्याचे किल्ले घेत असून सुद्धा दीलेरंखान काही प्रतिकारं करत नाही. त्यामुळे तो मुआजम वैतागला आणि त्यानी दीलेरंखानाला पत्रं लिहिलं..."शिवाजी राजे" आपले किल्ले-किल्ले घेत आहेत, तू गप्प काय बसलाय!!!" तरीसुद्धा हालचाल नाही दीलेरंखानाची. आणि मग! शेवटी औरंगजेबाच पत्रं आलंय...."तू नोकर कुणाचा? माझा कि शिवाजीचा! आणि मग! दीलेरंखानाला हालचाल करणं भाग पडलं. दीलेरंखान पन्हाळ्याला आक्रमणं करायला निघाला आणि मध्ये "आसनी" ला मुक्कमं पडला. "भीमसेन सक्सेना" नावाचा इतिहासकारं लिहितो, ""शिवाजींची माणसं गुप्तंपणे संभाजीराजांकडे येत-जात असतं. एके दिवशी शिवाजी महाराजांच्या माणसांनी संभाजी राजांना बाहेर काढले. विजापुरला मह्सुद्खानाकड़े नेले आणि तिथून मग! संभाजी राजे पन्हाळ्यावरं आले. म्हणजे शिवाजी महाराजांच्या माणसांनीच संभाजीराजांना सोडवून नेलंय, आता संभाजी जर फितूरं असते तर शिवरायं त्यांना परत कसे आणतील?. "खंडोजी खोपडा फितूरं झाला, शिवरायांनी त्याचे हात पाय तोडले". "संभाजी कावळी मोघलांना जाऊन मिळाला, प्रतापराव गुजराकर्वी त्याला ठारं मारलं". मग! शिवरायं तो न्याय संभाजीराजांना का लावत नाहीत? साधी गोष्ट आहे हि चाल शिवरायांची आहे. हे जे केलंय संभाजीराजांनी ते शिवरायांच्या इच्छेनुसारच केलंय आणि शिवरायांच्या राजकीय चाली अशाच राहिल्यात. ते गणेवाडीला जातो म्हणून सांगतात आणि सुरतेची लुटं करून परत येतात, संभाजींच वाटेत निधन झालं म्हणून सांगतात आणि संभाजींना सुखरूप घेऊन येतात. आपण अलीकडे म्हणतोच कि आजकालचे

राजकारणी बोलतात एक आणि करतात एक. त्याचं राजकारणंच काही काळात नाही. आत्ताच्या राजकारण्यांच राजकराणं आम्हाला कळत नाही मग! ३५० वर्षापूर्वीच्या शिवरायांच राजकारण आम्हाला काय कळणार?

गुप्तं गोष्टी आहेत. गोपनीय भाग आहे. काही लोकं म्हणतात, "पण! आमच्याकडे पत्रं आहेत ना संभाजी राजांनी दीलेरंखानाला पाठवलेली, आम्ही तुमच्याकडे यायला आतूरलोय, आम्हाला तुमच्याकडे घ्या". आता मला एक सांगा हा जरं गुप्तं आणि गोपनीय कटाचा भाग असेल तर संभाजी राजे दीलेरंखानाला असं लिहितील का.....,"राजमान्य राजश्री दीलेरंखान साहेबांशी शीरसाष्टांग दंडवत", त्याचं काय झालं आमचे आबासाहेबं नुकतेचं कर्नाटकंवरनं परत आलेत. आमचं सैन्यं थकलंय, शस्त्रंपण नीट तयार नाहीत त्यामुळे आमचे आबासाहेब म्हंटले, आपण काय आत्ताच दिलेरंखानासोबत लढू शकत नाही, मग! संभाजी राजे करता का असं!!! जाता का दिलेरंखानाकडे जावा जरा वर्ष दीड वर्ष तिथं जाऊन त्यांना गाफील ठेवा, झाली तयारी कि आम्ही तुम्हाला कळवतो मग! या इकडं"...कसा काय वाटतो आमचा कट दिलेरंखान साहेबं तुम्हाला, मग! काय म्हणताय तुम्ही? मग! येऊ का तुमच्याकडं?

अहो! साधी गोष्ट आहे. एवढं पण आपल्याला कळायला नको. एवढचं नाही संभाजी परत आल्यावर शिवरायं त्यांना फ्रेन्चांशी वाटाघाटी करायचे अधिकार देतात. मोघलांच्या विरोधी आक्रमणाची जबाबदारी ते संभाजींवरच सोपवतात. त्यामुळे संभाजीराजे "स्वराज्यद्रोही" नाहीत हि वस्तुस्थिती आहे. हि खरी गोष्ट आहे. संभाजी राजांच्या चारित्र्यावरचे डाग सरळ सरळ आमच्या लक्षात येतात. काही अर्थ नाही त्यात. एक अत्यंत शिवरायांना अपेक्षित असणारा वारसदार या महाराष्ट्राच्या मातीनं महाराष्ट्राला बहाल केलायं. ज्यांनी "स्वराज्य-स्वराज्य" उभं केलयं.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ११

(वाचा आणि शेअरं करा)

३ एप्रिल १६८० शिवरायांच निधन झालं. त्यावेळी संभाजी महाराज नुकतेच पन्हाळ्याला आलेत. ते रायगडावर न्हवते याच कारण! ते बुऱ्हाणपुराच्या स्वारीत अडकले होते. राजारामाचं लग्नं ते स्वारीत असतानाच झालं. म्हणून ते लग्नाला येऊ शकले नाहीत. ते कैदेत वगैरे अजिबात न्हवते. हि वस्तुस्थिती आहे. आणि शिवरायांच निधन झाल्यावरं शिवरायांच्या निधनाची वार्ता लोकांना कळाली तरं रायतेतं गोंधळ माजेल आणि शत्रू आक्रमणं करायची भीती आहे. म्हणून शिवरायांच्या निधनाची वार्तासुद्धा गोपनीय ठेवण्यात आली. पण! त्याचवेळी मंत्री रायगडावर जमा झाले. मंत्र्यांचा नवीनच डाव सुरु झाला. कसंही झालं संभाजीराजे गादीवर येत उपयोगाचे नाहीत. कारण! संभाजीराजे "धर्मपंडित", "संभाजी संस्कृत चे ज्ञानी", "संभाजी निर्णय क्षमता असणारे", "संभाजी प्रचंड बुद्धिमान", "संभाजी प्रचंड शौर्यशाली". संभाजी जरं गादीवर आले तरं अत्ताच ते आपला मुलायजा ठेवत नाहीत, पुन्हा तरं आपल्यालाच ठेवणार नाहीत. त्यामुळे कसल्याही परीस्थितीत संभाजी गादीवर येत कामाच नयेत. त्यापेक्षा राजारामाला गादीवर बसवूया. राजाराम अल्पवयी आहे, त्याला कारभारं जमणार नाही म्हणजे कारभारं आपल्याच हातात येणारं. स्वार्थी मंत्र्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी कसल्याही परिस्थितीत संभाजीला गादीवर येऊ न देण्याचा चंग बांधला. त्यासाठी सोयराबाइंना सरळ सरळ हाताशी धरलं आणि तिकडं कराडला "हंबीरराव मोहिते" जे सोयराबाइंचे सख्खे

बंधू, मराठेशाहीचे सरसेनापती, सरलष्करं, त्यांना निरोप पाठवला, पन्हाळ्यावर संभाजीला कैद करण्यास जायचयं. आपण ससैन्यं तयार रहा. त्यांची भूमिका अशी कि कुणाला वाटणारं नाही, आपला भाचा गादीवर येऊ नये. आता राजारामाला गादीवर बसवतोय म्हंटल्यावर मामा "हंबीरराव" तरं लगेच तयार होतील आणि झालंही तसंच हंबीररावांनी लगेच कळवलं "मी तयारच आहे, तुम्ही या मिळूनच संभाजीला कैद करायला जाऊ". मंत्री आनंदले, निघाले, आले. तळबीडला आले हंबीररावांच्या पुढं. चला आता सैन्यं घ्या संभाजीला कैद करायचयं. आणि त्याच क्षणी हंबीररावांनी डाव बदलला, बुंबरान त्याचं त्यांच्यावर उलटवलं. आल्या मंत्र्यांना सरळ काढण्या चढविल्या. सगळे कैद केले आणि पन्हाळ्यावर नेऊन संभाजींच्या पायावर घातले आणि कडाडले सरलष्करं..."ही घ्या नादान हरामजाद माणसं"..."राजं! जाऊन अजून अकरा दिवस नाही झाले आणि त्यांच्या पोटच्या गोळ्याला कैद करायला आलेत....घ्या ताब्यात!!!" आणि मंत्री फ़ित्तोरं गिरफ्तार झाले. संभाजी राजांनी त्यांना कैदेत ठेवलं. एक महिना पन्हाळ्यावरचं कारभारं चालवला आणि मग! संभाजी रायगडावर आले.

पण! या काळात संभाजींनी हंबीररावांना विचारलं..."मामासाहेब, आपण राजारामांचे मामा असून, आमच्या मातोश्री सोयराबाई साहेबांचे सख्खे बंधू असून आपण त्यांच्यापाठीशी उभं राहण्यापेक्षा आमच्या पाठीशी कसं काय उभं राहिलात?" त्यावेळी हंबीररावांनी सांगितलं, "या मंत्र्यांचा डाव लक्षात येताच आणि मंत्री माझ्याकडे येताच सोयराबाइंनी मला कळवलं कि, कैसेही करून संभाजी राजांना वाचविणे. सोयराबाइंनी निरोप दिल्यामूळच मी आपल्याला वाचवू शकलो". दुर्दैवानं सोयराबाइंची भूमिका मराठ्यांच्या इतिहासात "कैकैयी" सारखी करून टाकल्यामुळं त्याही व्यक्तित्वावर अन्याय झालायं ही सगळ्यात मोठी वस्तुस्थिती आहे. त्यांना भिंतीत छिलून-बिलून मारले, असल्या काही गोष्टी कल्पोकल्पित रंगवल्यात. अजीबात नाही, सोयराबाइंना कुणीही भिंतीत छिलून मारलं नाही उलट या घटनेनंतर दीड वर्ष पुढं सोयराबाई जिवंत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. रायगडावर संभाजीराजे आले. शिवरायांचे अंत्यविधी सुद्धा नीट झाले न्हवते. संभाजी राजांनी पहिल्यांदा ते करवून घेतले. रायगडावर शिवरायांची समाधी उभारली आणि तब्बल स्वराज्याची घडी नीट बसवून तब्बल नऊ महिन्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. "संभाजी राजे" स्वराज्याचे दुसरे "छत्रपती" झाले.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १२

(वाचा आणि शेअरं करा)

एके दिवशी "संभाजी राजांनी" सरलष्करांना विचारले, "मामासाहेब स्वराज्याचा घाट बांधावा म्हणतो, पण! औरंगजेबाचाही थाट उतरला पाहिजे. जागा शोधा मौक्याची". आणि हंबीररावांनी जागा काढली अगदी मौक्याची..."राजं! एक जागा हाय "बुऱ्हाणपुरा दारंउक् मुल्खदख्खन". "बुऱ्हाणपुरा" म्हणजे औरंगजेबाची दख्खनेतील राजधानी. एखाद्या सुंदरीच्या गालावरं तीळं शोभावा असा "बुऱ्हाणपुरा" शोभतो. ऐश्वर्य, संपत्ती, सामर्थ्य...अफाट! अन त्याच वेळी कडाडला छावा!..."मग, टाका छापा त्या बुऱ्हाणपुरावर, करा कोळसा पुरा त्याचा". अरे! सुटले मराठे, बुऱ्हाणपुराचे सतराचे सतरा पुरे धुतले. काही काही ठेवलं नाही. अरे! बुऱ्हाणपुरा म्हणजे औरंगजेबाचं "हळवं काळीज पानं". परं चेंदा-मेंदा करून टाकला मराठ्यांनी. पहिला तडाखा सोसतो न सोसतो तोच संभाजी राजांनी दुसरा तडाखा दिला "औरंगाबाद". औरंगजेबाच्या नावानी बसवलेले "औरंगाबाद". संभाजी राजांनी त्यालाच हात घातला. इतकं लुटलं, इतकं धुतलं कि औरंगजेबाच्या नावाशिवाय तिथं काही ठेवलंच नाही. एखाद्या बागेचं सौंदर्य डोळ्यात साठवावं म्हणून डोळे मिटावे आणि पुन्हा उघडून बघावं तरं पुढं स्मशानं दिसावं अशी अवस्था "औरंगाबाद"ची केली होती. औरंगजेब चरफडला, तरफडला भयाण वैतागला पण! त्याचवेळी त्याला तिसरा

तडाखा बसला. दस्तूरं खुद्द औरंगजेबाचा मुलगा त्याचा शहजादा "अकबरं" औरंगजेबाच्या विरोधात उठला. आणि सरळ आला महाराष्ट्रात कारण! त्याला माहितीये, या पुऱ्या-पुऱ्या हिंदोस्थानात औरंगजेबाशी झुंज घेईल असा एकचं ""मर्द सर्जा"" आहे......""संभाजी""

तो आला सरळ संभाजी राजांकडचं. औरंगजेबाला दुसरं कोणी नमवू नाही शकत...औरंगजेबाला दुसरं कुणी झुकवू नाही शकत...औरंगजेबाला दुसरं कुणी मातीत गाडू नाही शकत......एकचं ""संभाजी""

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १३

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांजवळ मैत्रीचं फर्मान घेऊन आलेल्या अकबरला संभाजींनी हाताशी धरलं आणि आपल्या राजकारणाच्या पटावरच्या चाली खेळायला सुरवात केली. पण! लागोपाठ तीन तडाखे बसलेला औरंगजेब चवताळून उठला. आग्यामोहळं उठावं असा औरंगजेब पिसाळला आणि उचलली पाऊलं त्यांनी "खासे दख्खन" वरं औरंगजेबाचे "साम्राज्यं" म्हणजे आशिया खंडातलं सगळ्यात मोठं "साम्राज्यं". आणि संभाजींच "स्वराज्य" म्हणजे आशिया खंडातलं सगळ्यात छोटं "साम्राज्यं". मनंभर सैन्यं कणभर मराठ्यांना चिरडायला निघालं. औरंगजेबाच्या नुसत्या सरदारांची संख्या साडे चौदा हजार होती, कईक नातंलग, शहजादे, अफाट-अफाट सेनापती, चार लाखांचं सैन्यं, चौदा कोटींचा खजिना, चाळीस हजार घोडी, सत्तर हजार घोडी, पस्तीस हजार उंट. अरे! औरंगजेबाची छावणी पडली तरं तीन मैलांचा परिसर व्यापून जायचा. एवढं अफाट सैन्यं आलं चालून महाराष्ट्रावरं आणि सह्याद्रीच्या कड्यांवरनं कडाडला छावा!..."येऊद्या त्या औरंगजेबाला, अखेरं! त्याला त्याच्या मरणाची जागा कळली तरं...!!!" आता बघेल या छाव्याचा "गनिमी कावा". आणि बघता बघता संभाजी सज्ज झाला. वय वर्ष अवघं तेवीस. महाराष्ट्राचं आभाळ काळवंडून गेलं. औरंगजेबानं एकापाठोपाठ मोहिमी लगडल्या.

सरबुलंद खान, आलेखान, फ़तेह्खान, शहजादा अज्जम, बेदारबख्त मुअज्जम, शहाबुद्दीन खान, बहादूर खान, एक-एक नामचीन सेनापती अफाट ताकदीने महाराष्ट्राला कैचीत पकडायला चाहोबाजूंनी आत घुसवले आणि मराठे सज्ज झाले. संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली त्यांनी मोघलांची लंगडेतोड चालू केली. मराठे सुसाट सुटले. जिथं भेटेल तिथं मोघलांना कपात राहिले. अरे! सरबुलंदखान मारं खाऊन परतला, फ़तेह्खान तोंड काळं करून गेला, तो बहादूर खान नुसता पळून पळून दमला, शहाबुद्दीन खानला तरं काही सुचेना. औरंगजेब चहोबाजूंनी नुसत्या शिखस्तीच्या बातम्या ऐकत राहिला. हार-पराभव, हार-पराभव. अरे! तेवीस वर्षाचा 'छावा' संभाजी मोघलांना पार सळो कि पळो करून सोडलं. तू महाराष्ट्रात येतो ना! संभाजी राजांनी विलक्षण युद्धनीती खेळली, मराठ्यांच्या फौजा सरळ मोघलांच्या प्रांतात घुसवल्या. इतकं इतकं फाडलं कि औरंगजेबाला काही कळेना, मराठे तिथं आले म्हणून सैन्यं पाठवावं तरं मराठे पुढं, मराठे तिथं गेले म्हणून सैन्यं पाठवावं मराठे त्याच्या पुढं, अरे! कुठं कुठं शिवावं? सगळीकडंच फाटत निघालंय. इथं शिवावं तरं तिथं मराठे फाडतायत, तिथं शिवावं तरं मराठे तिकडं फाडत निघालेत. कुठं कुठं? ठीगळं लावावी. वैतागून, संतापून गेला औरंगजेब. आपल्या सरदारांवर बरसत राहिला..."क्या करतें हो बंदोबस्त? खिल्लतें पेहेनके ख़ाली मारं खातें हो! इतनी फ़ौज दी दिमत ने कहाँ गयी ? कहाँ गया वों दख्खन का चुहाँ ?

तसा कुणी सरदार म्हणाला, "हुजुर वों संभा सैतान है!......अरे! फ़िर हम कहां सैतान से कम है!...फ़िर भी क्यों शिखस्त? फ़िर भी क्यों हार?" औरंगजेबानं मोठ्या थाटात मराठ्यांविरुद्धची मोहीम उघडली पण! संभाजी राजांनी त्याची पुरती वाट-वाट-वाट लावली. कडाडला संभाजी राजा,""आमच्याच वाटेवर येऊन...आमच्याशीच वाटमारी करणाऱ्याची...त्याच्या वाटेवर जाऊन...वाट लावल्याशिवाय...आमच्या वाटेवर परतत नाही आम्ही""..."तलवारीच्या टोकावर भाकरी भाजतात मराठे तुला भाजायला वेळं नाही लागणारं!!!" आणि बघता बघता मराठे भाजत-भाजत सुटले. त्या धगीनं औरंगजेब हैराण झाला.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १४

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांना शिखस्त करण्यासाठी काय करावं? याच संतापानं औरंगजेब विचारं करू लागला. आणि कुणीतरी औरंगजेबाला सल्ला दिला, "हुजूरं! मराठों की जान है, उनके गड्किलोंमें...पहलें गड्किलें ले लेतें है! मराठें खुदबखुद आयेंगे घुटने टेंकते हमारें सामने!......बहुत खूब!!! ये बात सच है! आणि त्यानी विचारलं..."ऐसा कौनसा क़िला है? जो जल्द से जल्द लिया जा सकतां है!"

तरसला होता विजयासाठी औरंगजेब, तरसला होता. आणि मग! एकानं सांगीतलं, "हुजूरं! एक क़िला है! नाशिक जिल्ह्यातला". "दिंडोरी" पासून अवघ्या दहा मैलावरं असणारा "प्रभु श्री राम" तिथं विश्रांतीसाठी जायचे. त्यांची सेज तिथं आहे. म्हणून त्या किल्ल्याचं नावं पडलं "रामसेज"..."हुजूरं! छोटासा क़िला आहे. आणि मराठे?...अवघे सहाशे हुजूरं! , तोफखाना?...कुछ नहीं हुजूरं! , बज्मीयत?...कुछ नहीं हुजूरं!..."कौन जाएगा?" आणि उभा राहिला शाहबुद्दीन खान, "हुजूरं हम जायेंगे!!!"...कितने दिनों में ले लोगें क़िला? कितने दिनं?..."हुजूरं एक दिनं काफ़ी है! आज गया क़ल क़िला लेकें आया!". औरंगजेब खुश झाला, "बहुत खूब!!!"...दहा हजाराची फौज दिली. "ज़ाव ज़ाव हमें 'रामसेज' चाहिए!" आणि विजयाची खबर ऐकायला औरंगजेब आतुरला, निघाला शाहबुद्दीन खान. वेढा टाकला "रामसेज"ला. अरे! अफाट सेनासागर मराठ्यांचे अवघे सहाशे मावळे वरनं बघतायत. प्रचंड सैन्यं, तोफा, बारूद, बज्मीयत...अफाट!!! आणि बघता बघता शाहबुद्दीननं वेढा लावला, मोर्चे लावले आणि आदेश दिला. "यल्गारं...!!!" अनं निघाली मोघली फौज "रामसेज"वरं वेस ओलांडून पुढं-पुढं पारं निम्म्यापर्यंत पोहोचली. आमच्या मराठ्यांची हालचालं ना प्रतिकारं. शाहबुद्दीन खानाला वाटलं, बहुतेक न लढताच किल्ला देतायत वाटतं. मोठा उत्साह आला..."चलो आगे!...चलो आगे! ले लो क़िला. सैन्यं पुढं-पुढं-पुढं, सैन्यं निम्म्याच्या पुढं आलं तसे आमचे मराठे सावध झाले. किल्लेदारांची इशारत घुमली, मराठे उभे राहिले. हातातल्या गोफण्या थरारल्या, दगडं भरली...सुटली दगडं. "दणा-दणा-दणा-दणा,,थाड-थाड-थाड!!!" दगडं आदळू लागली. पत्थरांची बौछारं नुसती. त्या दगडांच्या मारांनी घायाळ झालं शहाबुद्दीनचं सैन्यं. पाठीला पाय लाऊन पळत सुटलं. त्या शाहबुद्दीनच्या मस्तकावर दगडं बसलेला ती जखम दाबीत शाहबुद्दिन म्हणाला..." कैसे है ये मराठें, पत्थरोंसे खेलतें है! " एका दिवसात किल्ला घेतो म्हणालेला तो शाहबुद्दीन खान रात्री खलबत खाण्यात जखमा शेकत बसला होता.

"क्या किया जाय अब?" त्यात एक सरदार होता मोठा त्याने युक्ति काढली, "हुजूरं ऐसा करतें हैं...बोलो!...नहीं काल आपण

चालत चालत गेलो दगडं डोक्यावरं बसली, उद्या चालत चालत नको जायला...मग!...सर्र्पटत, सर्र्पटत जाऊ म्हणजे दगडं आली तरी वरनं जातील आपल्याला लागणारं नाही. मोठी नामी कल्पना, फतेखानला पटलं..."ऐसा हि करेंगे!". दुसऱ्या दिवशी चढाई सुरु झाली. उरलं-सुरलं सैन्यं निघालं, निघालं-निघालं सरपंटत, सर्र-सर्र-सर्र करत पुढं, पुढं-पुढं-पुढं वेस ओलांडून पुढं पार निम्म्यापर्यंत. कुणी डोकं वरं करायला तयार नाही, चुकून डोकं वरं करायचो, डोक्यात दगड बसायचा, डोक्याला ताप नको बघ खाली आणि चाल पुढं, सर्र-सर्र करत निघालाय सैन्यं. आता जवळ-जवळ किल्ल्यावरं पोहोचणारचं. शहाबुद्दीन आनंदला "ले लिया किला...चलो आगे!" आणि हे सर्र्पटनारं सैन्यं टप्प्यात आलं तसे मराठे सावध झाले. रात्रंभर जागून तटबंदीवर मोठ-मोठ्या दगडी शीळा गोळा करून ठेवलेल्या. हे सैन्यं जवळ आलं तशा दगडी शीळा दिल्या नुसत्या ढकलून, गडगडा करत शीळा सुटल्या खाली. सर्र्पटणाऱ्या प्राण्यांना कायमचं सर्र्पटणारं करून मग! तळा जाऊन थांबल्या.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १५

(वाचा आणि शेअरं करा)

शहाबुद्दीनला काही कळेना, "क्या किया जाय?" मग! त्यांनी स्वतःच्या तोफखाना प्रमुखाला बोलावलं, "क़ल तोफें लाना, डागों तोफें कीलें पर...बस्सं!!! तोफों सें कितने पंल में आएगा क़िला हाथ में?" तोफखान्याचा प्रमुख म्हणाला..."हुजूरं! दोन तासांत किल्ला तुमच्या पायावरं ठेवतो". आणि बघता बघता त्यानी तोफा लावल्या, रात्रं झाली आता सकाळी युद्धाला सुरवात होईल. सगळे मोघल निवांत झोपले, उद्या सकाळी उठायचं आणि तोफखाना लावायचा, बस्सं!!! तोफा चालू झाल्या कि किल्ला ताब्यात. पण! त्याचं रात्री सगळे निद्रादेत असताना दीड-दोनच्या सुमारास "मराठे" काही किल्ल्यावरून खाली आले. सरळ शहाबुद्दीनच्या छावणीत घुसले. सरळ-सरळ कापाकापी केली. सगळा हल्ल-कल्लोळ माजवला. मोघल जागे व्हायच्या आत "मराठे" परत गायब!

"छापा-छापा, मराठों का छापा"...निंद उडाली मोघलांची. शहाबुद्दीन चार्र्फडत राहिला. सकाळ झाली, तोफखाना प्रमुखाला तोफा लावायला सांगितलं, तोफा लागल्या, दारू ठासली आता फक्त पेटवायचं वातांन, अन तोफखाना प्रमुख पुढं गेला, तोफेला बत्ती लावणारं त्याचं वेळी वरनं "धाडं-धाडं" करत तोफेचा गोळा आला, शेजारीच "धाड्म-धूम" तसा तोफखान्याचा प्रमुख म्हणाला..."पीछे लो-तोफें पीछे लो" मोघलांचा तोफमारा सुरु व्हायच्या आधी मराठ्यांचा तोफमारा. त्या तोफखाना प्रमुखानं सगळ्या तोफा मागं घ्यायला लावल्या आणि पाठून गोळे सोडायला लागला, पण! तोफा मागे घेतल्यानं गोळे काय किल्ल्यावरं जाईनात. आता मागे आलो म्हणून गोळे जाईनात म्हणून पुढं यावं तर पुढं आलो कि मराठ्यांचे गोळे अंगावरं बरसतायत...करायचं काय?

शहाबुद्दीन खानानं विचारलं..."क्या हुआ?"......"काय होत नाही हुजूरं!, तोफा पुढं नेल्या कि त्यांचे गोळे अंगावर, तोफा मागं नेल्या तर आपले गोळे पोहोचेनात"......अरे! तुम्ही तर म्हणाले ना मराठ्यांकडे तोफा नाहीत!..."हुजूरं!, मराठ्यांकडे तोफा नाहीत पण! डोकं तर आहे"......म्हणजे?......"हुजूरं! मराठ्यांनी लाकडाच्या तोफा तयारं केल्यात,त्याला जनावराचं कातडं लावंलय आतनं"......"ठीक हैं,तोफ एक हि हैं!"......"साधी नाही तोफ हुजूरं!, आपल्या दहा तोफांना एक तोफ भारी आहे त्यांची"......"अरे! ठीक हैं, तोफा तयार केल्या पण! गोळे?, तोफगोळे कुठणं आणले त्यांनी?"..."हुजूरं!, मग "मराठे" रात्री कशाला आलते? हे गोळे आपलेच आहेत"

शहाबुद्दीन खानाला काही कळेना, काय?...काय?...काय?...करायचं!

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १६

(वाचा आणि शेअरं करा)

महिना झाला, दीड महिने झाले, दोन महिने झाले, तीन महिने झाले, चार महिने झाले, पाच महिने झाले. सहाशे मावळे किल्ला अजिंक्य ठेवतायत. अरे! पुढं तसूभरं सरू देईनात. चार्ऱ्फडला, वैतागला शहाबुद्दीन खान. शेवटी डोक्यातनं युक्ती निघाली तोफा मागे घेतल्या तर गोळे पोहोचत नाही ना...आदेश दिला सैन्याला, झाडं तोडा आजूबाजूची सगळ्या जंगलातली, सगळी लाकडं तोडली. दीड-दोन महिने काम चालू आहे.

शहाबुद्दीननं अफ्लात्म किमया केली. किल्ल्याच्या उंचीचा प्रचंड मोठा लाकडी बुरुंजच त्यांनी उभा केला, लाकडी दमदमा...का? तर तोफा आता या लाकडी बुरुंजावर नेउन ठेवायच्यात. किल्ल्याच्या उंची इतक्या, अन तितनं मग! खाली डागायच्या बस्सं!!!

साधी गोष्ट नाही, कौतुकं केलं पाहिजे शहाबुद्दीनचं कौतुकं!!! अरे! किल्ल्याच्या उंची इतका लाकडी बुरुंज आणि तोही केवढा पन्नास तोफा बसतील वरं आणि पाचशे सैनिक उभा राहतील वरं एवढा मोठा बुरुंज. सगळा बुरुंज बांधेपर्यंत मराठे शांत बघत राहिले. बुरुंज उभा राहिला, तोफाही वरं चढविल्या आता उद्या बुरुंजावरुन तोफमारी चालू करायची, किल्ल्यावरं किती दिवस लढतायत बघू?

रात्री सगळे थकले, मोघल शांत पडले आणि मराठे नेमके मध्यरात्री बाहेर पडले. त्या बुरुंजाच्या पुढं आले, दारुगोळा त्या बुरुंजाच्या कडेनी ठासून भरला. पूर्वी हुक्के असायचे हुक्के म्हणजे "गावठी बॉम्ब" हे मराठी हुक्के एका बाजूनी मोघलांना पत्ता लागू नये, मोघल छावणीमध्ये हुक्के टाकत राहिले. मोघलांचा कल्लोळ उडाला आणि तेवढ्या वेळात बुरुंजाभोवती सगळी दारू ठासली. सुरुंग पेरले, वातानी पेटवल्या आणि बघता बघता पेटली..."थुई-थुई-थुई" करत वातान पेटत गेली आणि "धाड्म-धूम" अवघा बुरुंज ढासळला, तोफांसकट खाली. मराठ्यांच्या किल्ल्यावर गोळे पडायच्या आधीच मराठ्यांनी बुरुंजाचाच निकाल लावला.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १७

(वाचा आणि शेअरं करा)

वर्ष झालं, दीड वर्ष झालं, दोन वर्ष झाली. औरंगजेबानं शहाबुद्दीनला विचारलं, "तुम्हारा एक दिनं कितनें बरसों का होता है?"...अरे! एक दिवसात किल्ला घेतो म्हणालेला दोन वर्ष झाली,"आओ वापस!", शहाबुद्दीनला माघारी बोलवलं आणि पाठवला 'फ़तेह्खान'. "फ़तेह्खान" तुम्हारे नाम में हि फ़ते हैं! हमें फ़ते चाहिए!" वीस हजाराची फौज घेऊन आला, त्या "रामसेज" ला चिकटला, गोचीडीसारखा चिकटला, झुंजत राहिला, लढत राहिला. पण! मराठे टक्करां देत राहिले. अरे! टाप नाही मराठ्यांशी झुंजायचं, अजीबात नाही. तसूभरं पुढं सरकू देईनात. फ़तेह्खान वैतागला, संतापला काही काही करता येईना. अरे! सहाशे मराठ्यांनी सळो कि पळो करून सोडलं. त्या फतेह्खानला काही कळेना, शेवटी एक मांत्रिक त्याच्याकडं आला, म्हणाला..."हुजूरं! मी भूतं वश करायच्या कामात तरबेज आहे. मला फक्तं एक सोन्याचा नाग तयारं करून द्या, नाही तुम्हाला किल्ल्यावरं घेऊन गेलो तर मग विचारा...!

फतेह्खानानं या मांत्रिकावरं विश्वास ठेवला, त्याला सोन्याचा नाग तयारं करून दिला. मांत्रिकानं नाग छाती जवळ धरला आणि म्हंटला..."मी पुढं चालतो तुम्ही मागनं या...बघा माझी जादू!" मांत्रिक पुढं निघाला सैन्यं मागं. फतेहखानला वाटलं आता मराठे काही नाही करू शकत, मांत्रिकाची जादू आहे. तो वेस ओलांडून पुढं आला. मराठे नुसते बघतायत...एक नाही-दोन नाही येऊ द्या त्याला. निम्म्यापर्यंत आला,निम्म्यापर्यंत जसा आला तशी मांत्रिकाची छाती फुगली..."म्हंटलेलो कि नाय घेऊन जातो वरं, आलो कि नाय इतवर"...चला पुढं...पुढं-पुढं-पुढं टप्प्यात आला तसा वरनं गोफणीचा एक धोंडा असा "घुंग-घुंग-घुंग" करत आला त्या मांत्रिकाच्या छाताडावर, डोळं पांढरं करून मांत्रिक तिथंच पडला. नाग एकीकडं, मांत्रिक तिसरीकड, फतेह्खान पळत मागं!

अरे! जिथं माणसं काही करू शकत नाहीत तिथं भूतं काय करणारं? मराठ्यांनी फतेह्खानच्या भूतांचाही निकाल लावला.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १८

(वाचा आणि शेअरं करा)

तीन वर्ष झाली, साडे तीन वर्ष झाली, चार वर्ष झाली. औरंगजेबानी फतेह्खानला सांगितलं, "तूम सिर्फ़ नाम कें ही फ़तेहखान हो......आव वापस!"..."अब! कौन जाएगा?" आणि उभा राहिला कासम खान..."हम जायेंगे!"

पुन्हा झुंज चालू, पुन्हा लढाई चालू...चार वर्ष, पाच वर्ष, सहा वर्ष झाली. "रामसेज" अजिंक्यच राहिला. अरे! आपले शिवराय म्हणायचे..."माझा एक किल्ला मावळ्यांनी एक वर्ष लढवला, तरं माझे सगळे किल्ले घ्यायला औरंगजेबाला ३५० वर्षे लागतील". संभाजी राजांनी "रामसेज" नावाचा एकंच किल्ला सहावर्ष लढवला, सहा गुणिले साडे तीनशे. औरंगजेबाला सगळे किल्ले घ्यायला किती वर्ष लागतील???

अरे! टाप नाही टाप, वैतागला-संतापला औरंगजेब आणि त्यांनी त्याच रागात डोक्यावरची पगडी काढली...खाली आपटली, "जोपर्यंत त्या संभाजीला पराभूत करत नाही वा गिरफ्तारं करत नाही तोपर्यंत डोईवरं बादशाही पदाची पगडी घालणारं नाही". इथच महाराष्ट्रात मेला औरंगजेब पण! मरतेवेळी सुद्धा त्याच्या डोईवरं बादशाही पदाची पगडी न्हवती. मरेपर्यंत "संभाजी राजाने" त्याला ते भाग्यं मिळूच दिलं नाही. औरंगजेबाला मराठ्यांना पराभूत करताच आलं नाही.

सल..सल..सल करत होता औरंगजेब पण! काही काही उपयोग न्हवता. "अरे! औरंगजेब बोलत खूप होता,पण! सांगत काहीच न्हवता...औरंगजेब चालत खूप होता,पण! पोहोचत कुठचं न्हवता...औरंगजेब लढाया खूप खेळत होता,पण! जिंकत कुठचं न्हवता".

हि हि सगळी ताकद या सव्वीस वर्षाच्या "संभाजीची", अफाट ताकदीने औरंगजेबाला रोखलं, पुऱ्या दख्खनेमधला एक खण...एक खण नाही घेऊ दिला त्या औरंगजेबाला आपल्या "सर्जा संभाजीनं".

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग १९

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबानं जाळं टाकलं, "जंजीऱ्याच्या सिद्धीला" औरंगाजेबानी उकसवलं..."मराठ्यांवर चाल करा", पोर्तुगीजांना फितवलं..."चालून जा मराठ्यांवर", इंग्रज हाताशी धरंले..."आक्रमणं करा मराठ्यांवर"

पोर्तुगीज, इंग्रज, मोघल...बस्सं!!!

एक नाही,दोन नाही तब्बल बारा गडं उभारल्या स्वराज्याच्या विरोधात, आणि तब्बल बारा गड्यांवर निखराची पंजेफाड करत "सर्जा संभाजी राजा" झुंजत राहिला...झुंजत राहिला...बस्सं!!! औरंगजेबाच्या चेतावणीमुळं सिद्धीनं हैदोस मांडला. जंजीऱ्यातला सिद्धी, "राम पाटलानं" बांधलेला "जंजिरा" आदिलशाहीकडं आला आणि मग! सिद्धीकडं पोचला. आता हा सिद्धी म्हणजे "मुजोरं" आणि "माजोरं" झालेला. अरे! जंजीऱ्याला बेलाग संरक्षण दर्याचं, पोहोचणं कठीण तिथं. "शिवाजी महाराजांनी" कैक वेळा प्रयत्नं केला, "जिथं शिवराय तिथं विजय" पण! "जंजिरा" त्याला अपवाद ठरला. जंजिरा जिंकता आला नाही. त्याच्या भोवताली..."रोह्याची खाडी, दलदलीचा प्रदेश, आणि समुद्राचं बेलाग संरक्षण". जंजिरा जिंकणं सोपं न्हवतं.

हे हाप्शी सिद्धी जंजीऱ्यातून बाहेरं पडायचे, कटावरच्या गावातल्या बायका बाटवायचे, त्यांना समुद्रांत भरं तरवावरं आब्रू लुटत सोडायचे, आक्रोश किंकाळ्या तिथं वाऱ्यावरं भिजायच्या. माणसांना पकडायचे त्यांचे नाक, कान कापायचे, 'रक्ताळायचा'...'रक्ताळायचा' दर्या. अरे! किती बायका बाटवल्या असतील???...किती माणसं कापली असतील???...किती?किती? अकांत...अकांत मांडलाय. हि माणसं एकेदिवशी आली संभाजीकडं..."राजं!...राजं!, ह्यो सिद्धी माती करतूया पारं, बाया-बापड्या पळवतूया, भोगतूया, लुटतूया, माणसं बाटवतूया" आणि कडाडला छावा...!!! "आमच्याच मातीत येऊन आमचीच माती, त्या सिद्धीची एकदा माती केलीच पाहिजे! खेळू जंजीऱ्यावरं रक्ताची रंगपंचमी" आणि निघाला "सर्जा" जंजीऱ्यावरं पण! लढाया बुद्धीनं जिंकणारे "संभाजी" दंडराजपुरला आले, दंडराजपुरी ताब्यात घेतली. पण! त्याचं वेळी बघितलं "जंजिरा" बाहेरून जिंकता येणारं नाही. "जंजिरा" घ्यायचा असेल तरं त्याच्या पोटात हात आत घालूनचं कोतळा बाहेरं

काढला पाहिजे. आणि संभाजींची विलक्षण बुद्धी, विलक्षण चाल खेळू लागली.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २०

(वाचा आणि शेअरं करा)

कोंडाजी पकडला गेला, कोंडाजीचे हात दारूगोळ्याच्या कोठाराला लागण्या आधीच कलम केले गेले. कोंडाजीला तोफेला बांधण्यात आलं. अरे! नगारंखाण्यावरं त्याच्या धडाचे तुकडे..तुकडे उडंवले, कोंडाजीच मस्तक नगारंखाण्याला टांगलं. अरे! त्या कोंडाजीच्या स्वामीनिष्ठ रक्ताचा अभिषेक दर्याला झाला आणि दर्या रक्ताळंला, 'चिंधड्या-चिंधड्या' उडवल्या. जे साथीदारं सापडले त्यांची मस्तकं मारली. मराठे कापले गेले, अरे! ज्या धडाक्याची वाटं संभाजी राजे बघत होते त्याच्या ऐवजी कोंडाजीच्या शरीराच्या 'चिंधड्या-चिंधड्या' करणाऱ्या धडाक्याचा आवाज त्यांच्या कानावरं पडला. अरे! चवताळला 'छावा..!' आणि सज्ज झाल्या मराठ्यांच्या तोफा..."द्या बत्ती तोफांना" आणि बघता बघता मराठ्यांच्या तोफेतून गोळे सुटू लागले. जंजीरा पाण्यात डचमळू लागला, नगारंखाणा पडला, सिद्धीचे सारे महाल आडवे झाले. "मराठ्यांचा एक तोफेचा गोळा...बलाढ्य!"

जंजीरा पारं उध्वस्त..उध्वस्त होत गेला. सिद्धी खैरतखान, सिद्धी कासमखान जीव मुठीत घेऊन पाळायला लागले. या संभाजीपुढं, या रौद्रापुढं टिकनं मुश्कीलं. तो सिद्धी खैरतखान एका टेकडीमागं लपून बसला आणि अचानक गोळा आला नजदीक बस्सं! काळजाचं पाणी..पाणी झालं, कळून चुकलं हा संभाजी आता सोडत नाही..बिलकुल सोडत नाही. पण! जंजीरा ताब्यात आता यायलाच निघाला, पण! ऐनवेळी दर्या सिद्धीच्या मदतीला आला, समुद्राला भरती आली, मराठ्यांना मागं सरावं लागलं. पण! थांबतील ते "संभाजीराजे" कसले.

अरे! मराठ्यांचा जन्म विजांच्या कडकडाटात आणि तोफांच्या गडगडाटातचं झालायं. आगीशी खेळणारी माणसं आम्ही पाण्याला भिउन पळणारं नाही. "संभाजी" आगीशी खेळणारा पाण्याला कुठंला घाबरतो. त्याचंवेळी विलक्षण युक्ती डोक्यातनं निघाली, "जे रामायणामध्ये प्रभू श्री रामांना सुचलेली"...."या दर्यालाच वेसण घातली तरं..?" आणि अंमल चालू झाला "दर्यातच पुलं बांधायचा"..कापसाच्या गाठी, लाकडाचे ओंडके, भलेमोठे दगड समुद्रात टाकले जाऊ लागले.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २१

(वाचा आणि शेअरं करा)

बघता बघता सेतू तयारं व्हायला लागला पण! समुद्राच्या लाटां सेतू बंधू देईनात,लाकडाचे ओंडके किनाऱ्यावरं टाकू लागल्या,कापसाच्या गाठी बाहेरं फेकू लागल्या. पण! थांबतायत ते "संभाजी राजे" कसले. मोठ्या चिवटपणे काम चालू ठेवलं.

( कधी जंजीऱ्यावरं गेलात न तरं "संभाजी राजांनी" समुद्रात बांधलेला तो पुलं अजूनही दिसतो...दिसतो अजूनही )

दर्या बंधू देईना, पण! संभाजी हटायला तयारं न्हवते. सिद्धी खैरतखान, सिद्धी कासमखान पुरते उलथे..पालथे झालेले. आता! संभाजी सोडत नाही आणि आता जंजिरा जवळजवळ हातात आलाचं, मराठ्यांच्या तोफा आग ओकत होत्याच, "लांडा कासम", "कलाल बाघडी" या सिद्धीच्या तोफांनी कधीचं माना टाकलेल्या. मराठ्यांच्या तोफांची धग त्यांना सोसली नाही. आता जंजिरा हातात येणारचं पण! त्याचवेळी औरंगजेबानी जहरी चाल खेळली, "कल्याणला" हसन अली खान पाठवला आणि वार्ता संभाजी राजांना मिळाली..."कल्याणला हसन अली खान चालून आलाय" आणि संभाजींच्या काळजाचा ठोका चुकला. "कल्याण" म्हणजे "स्वराज्यं". जंजिरा घ्यायच्या नादात "स्वराज्यं" औरंगजेबाच्या घशात जायला नको. संभाजी राजांनी सरळं वेढा दादाजी पंत, वेसाजी पंतांवर सोपवला आणि संभाजी राजे कल्याणकडं चालते झाले. बघता बघता कल्याणला पोहोचले, हसन खानला तुडवं..तुडवं तुडवला आणि कल्याणवरं पुन्हा "भगवा" फडकला. पण! "जंजिरा" त्यापासून हातातनं गेला तो गेलाच, या घटनेमुळं "जंजीरा" काही हातात आलाच नाही.

पण! सिद्धीवरं अशी जरब बसवली संभाजी राजांनी की, संभाजींच नाव ऐकलं तरी जंजीऱ्याच्या काठंच दर्याचं पाणी चळाचळा कापायचं. इतकी अफाट!...अफाट! जरब बसवली "सर्जा संभाजी राजांनी"

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २२

(वाचा आणि शेअरं करा)

अरब लोकं दर्यात यायचे कोकणातल्या बायका पळवायचे, बाटवायचे. "संभाजी राजांनी" आदेश दिला..."फ़िल्तोर गिरफ्तारं करा...!" आणि "कानोजी आंग्रेंनी" दोन-दोन जहाजं गिरफ्तारं केली. दोनशे अरब सापडले, संभाजी राजांच्यापुढं हाजीरं केले. संभाजी राजांनी बघितलं आणि सांगितलं......

( आपल्या साताऱ्याच्या शेजारी "वासोट्याचा किल्ला" आहे. दिवसा ढवळ्या तिथं कोणी जात नाही. इतकं प्रचंड जंगल, माणसाची बात सोडा पाखंरही तिथं फिरकत नाही. एकदा चुकूनं चार पाच पोरं गेली होती शेवटी "हेलीकॉप्टरं" नी शोधून..शोधून काढावी लागली. इतका भयाण आहे...खूप खूप भयाण, चिटंपाखरु नसतं, एखादा नुसता शांततेने मरेल तिथं इतकी भयाण शांतता)

संभाजींनी सांगितलं, "या दोनशे अरबांना त्या वासोट्याच्या किल्ल्यावर नेऊन ठेवा" आणि आमचा संताजी होता त्याला सांगितलं, "एक करायचं...ह्यांना इतकं मारायचं...इतकं मारायचं...इतकं मारायचं हे फक्त मेले नाही पाहिजेत. आणि दोन महिने मराठे अरबांना मारत होते, इतके कि फक्त मरूचं देत न्हवते. एका आठवड्यातच ते एकमेकांना ओळखेनासे झाले होते इतके सुजलेले. दोन महिने मराठ्यांनी तुडवं..तुडवं तुडवलं, सुजवलं, आणि मग! दोन महिन्यांनी संभाजी राजांनी सांगितलं "आता त्यांना बाहेरं काढा, त्यांच्या जहाजावर बसवा आणि द्या सोडून परत त्यांच्या देशाला".

संताजी म्हंटला..."महाराज!...सोडायचं होतं तरं धरलं कशाला?" महाराज म्हंटले..."दे रे सोडून!!!"

त्या दोनशे अरबांना त्यांच्या जहाजात बसवलं, त्यांच्या देशाला पाठवून दिलं आणि मग! संभाजी राजे संताजीला म्हणाले..."आता हे ह्यांच्या देशात जातील, त्यांच्या प्रांतात जातील, त्यांच्या गावात पोहोचतील, ह्यांच्या घरापुढं येतीलं, दारापुढं उभा राहतील, दारं ठोठावतील, यांच्या बायका दारं उघडतील, ह्यांना बघतील आणि म्हणतील..."आमचे हे घरात नाहीत,,,नंतर या!" ह्यांच्या बायकाही ह्यांना ओळखायच्या नाहीत इतके...इतके सुजवलेत, इतका नक्शा बदलवंलाय मराठ्यांनी...उद्या चुकून कोणी महाराष्ट्राकडं तिरक्या नजरेनी यायला निघालं तर पहिल्यांदा हा आवाज येईल..."कुठं निघाला?"......"महाराष्ट्रात"......"नको जाऊ, अजीबात नको जाऊ...माझी अवस्था बघितलेलीस ना...नको महाराष्ट्रात तेवढा नको"

उद्या तिरक्या नजरेनं कुणी येणारं नाही महाराष्ट्रात, संभाजी महाराजांनी जरब बसवलेली ती अशी. अरे! पोर्तुगीज 'थय्या..थय्या' नाचवले, गोव्यावरं हल्ला केला, पारं मांडवी नदी तुडवून संभाजी राजे गोव्यात घुसणारं,,अरे! तो "इब्राही व्हाईस राय" पारं वैतागला, गोवा हि राजधानी सोडून त्यानं दुसरीकडं राजधानी तयारं करायचा डावही मांडला. पोर्तुगीजांच उपर राज्यं संभाजीराजांनी उध्वस्त केलं. इंग्रजांशी तह केला,इंग्रजांची मस्ती पुरती जिरवली,सरळं केज्विन नावाच्या गव्हर्नरंला सांगितलं..."मुंबई विकत दे, अन चल चालू पडं!"...अरे! जर त्यावेळी "संभाजी राजांनी" तहात मुंबई विकत घेतली असती ना तर दीडशे वर्ष इंग्रजांचे पाय आमच्या छाताडावरं नाचलेच नसते. इंग्रजांचा धोका ओळखला होता ना तो या "सर्जा संभाजीनी"

औरंगजेब 'थय्या-थय्या' नाचवलाय...पोर्तुगीज वाकवंलाय...इंग्रज झुकवंलाय...सिद्धी पारं आडवा केलायं...एक नाही,दोन नाही तब्बल बारा गडांवर निखराची पंजेफाड करत "सेनाधुरंदर सर्जा संभाजी" अजिंक्यचं राहिलाय.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २३

(वाचा आणि शेअरं करा)

वैतागला...वैतागला होता औरंगजेब. अरे! एकही चाल यशस्वी नाही एकही...

गडकिल्ले घेतो म्हंटल, हे "मराठे" गडकिल्ले सोडायला तयारं नाहीत. अरे! एक-एक मावळा साधा नाही, "संभाजी राजांनी" एक -एक मावळा असा घडवलाय जणू काय एक-एक बुलंद गडकोटंच. या महाराष्ट्राच्या छाताडावरं फक्त साडे तीनशे गडकोटं नाहीत. या महाराष्ट्रात उगवंलेला प्रत्त्येक जण एक-एक गड आहे. संभाजी राजांच्या..."राज्यासाठी", "स्वराज्यासाठी" झुंजतोय अफाट...अफाट ताकदीनं.

अरे!..."पाण्यावरचा पहिला तरंगता तोफखाना आपल्या संभाजी राजांनी चालू केला", "गुलामांच्या विक्रीला जागेवरं बंदी घातली", "कईक नव्यानं व्यापारी पेठा वसविल्यात", "शेतकऱ्यांची कर्ज माफ केलीत..त्यांना शेतीसाठी सोईसुधारणा करून दिल्यात..पाण्याचे प्रवाह प्रत्यक्ष वळवून पिकाच्या वाढीसाठी लक्ष्यं दिलंय", "पोटंच्या पोरासारखं रयतेवरं प्रेमं केलंय", "फक्तं तलवारं बाजीच नाही रयत कल्याणाच्या बाबीसुद्धा हा राजा अखंडपणे करत राहिलाय".

अरे!..."नऊ वर्ष संभाजी राजांनी तब्बल १४० लढाया केल्या, पण! एकाही लढाईत पराभूत न होणारा राजा म्हणून "गिनीज बुक" ला सुद्धा "संभाजी राजांचीच" नोंद घ्यावी लागली"..."कधी हरला नाही, मागं फिरला नाही, वाकला नाही...अजीबात नाही! जो झेपावत राहिला अदिम उत्साहानं...अफाट ताकदीनं...प्रचंड शौर्यानं...आपण "शिवछत्रपतींचे पुत्रं" आहोत याच धारणेनं...

जगवत राहिलाय "स्वराज्यं"...संवर्धीत करत राहिलाय "स्वराज्यं" अफाट ताकदीनं......

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २४

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी कर्नाटकात गेलेत. कर्नाटक मुठीत घेतंलय. तंजावर पर्यंत पार मराठ्यांनी राज्याच्या सीमा बडविल्या. 'त्रिवेंद्रम', 'त्रिचनापल्ली', 'मद्रास', कावेरी नदी ओलांडली तो पाषाण कोट जिंकलाय.

चेष्टा नाही, 'आंध्रप्रदेश', 'कर्नाटक', 'तमिळनाडू', 'मद्रास'...कुठंवर-कुठंवर झेप मारली या "सर्जा संभाजीनी".

अरे! कधी रायगड, कधी पन्हाळा, कधी गोवा, कधी जंजिरा, कधी त्रिचनापल्ली, कधी पाषाणकोट......अरे! वाऱ्यासारखा फिरतोय नुसता. दिवसाच्या चोवीस तासातले वीस तास घोड्यावर मान टोकून लढायचा, प्रसंगी शाळूच्या मातीच्या भाकरी खायचा पण! मराठी राज्यासाठी अफाट ताकदीनं झुंजत रहायचा.

अरे! तलवारीच्या टोकावरं मरण घेऊन हिंडतात "मराठे"

""औरंगजेबा तूला मारायला वक्त नाही लागणारं. "आई भवानीचं" राज्यं हे नको हात घालूस""...गर्जत राहिला बरसत राहिला "संभाजी राजा".

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २५

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं औरंगजेबानी आपल्या दरबारीयांना विचारलं..."क्या किया जाय?" आणि सगळे सरदारं म्हणाले..."हुजूरं! वापस लौट चलते है!" आणि अखेरं औरंगजेबाला महाराष्ट्र सोडवा लागला. संभाजी राजांच्यावर आक्रमण करायची वाट त्यानी बदलली, माघारं घेतली आणि गेला आदिलशाहीवरं. "आदिलशाही" अवघ्या सहा महिन्यांत त्यानं जिंकली. मग वळला "कुतूबशाहीकडं", "गोवळकोंडा" त्यानं अवघ्या एका महिन्यात जिंकलं. अरे! आदिलशाही जिंकायला सहा महिने लागतात, गोवळकोंडा जिंकायला एक महिना पुरतो आणि संभाजी राजांच "स्वराज्यं" जिंकायला त्याला नऊ वर्ष शक्यं होत नाही. हे शौर्य कुणाचं?...हा पराक्रम कुणाचा?...हे धाडसं कुणाचं?...हे साहस कुणाचं?..."सर्जा संभाजींच"

अरे! खजिना वाढवलाच नाही, अफाट..अफाट ताकदीनं संवर्धीत केलाय, मराठी फौजा शिवरायांच्या काळात जेवढ्या होत्या त्याच्या "पाचपट-सहापट" वाढवल्यात. अरे! पाच जहाज बांधणीचे कारखाने काढलेत, 'कुडाळ-डिचोळीला' दारूगोळ्याचे कारखाने उभारंलेत संभाजी राजांनी. साडेपाच हजार गलबतं दर्यात तरंगतेय दर्यात. अरे! "सरंखेल कान्होजी आंग्रा", "सरंखेल दौलतखान दर्यासारंग" बेपनाह हुकुमत गाजवतायत बेपनाह. काहीच वर्षांपूर्वी त्या "ताज हॉटेल" वर हल्ला झाला. समुद्रातून अतिरेकी आले. ३५० वर्षापूर्वी आपल्या संभाजी राजांनी सांगून ठेवलय..."महाराष्ट्राला धोका जमिनीवरनं नाही, महाराष्ट्राला धोका समुद्रावरनं आहे". हे त्या राजानं सांगितलय. अरे! दर्यावरं बेपनाह हुकुमत गाजवलिये राजांनी बेपनाह. साडेपाच हजार गलबतं दर्यात आहेत. टाप नाही महाराष्ट्रावरं तीरक्या नजरेनं कुणी यायची. चाहोबाजूंनी सुरक्षित ठेवलंय "स्वराज्यं". एक-एक गडकोट बुलंद बलाढ्य करून ठेवलाय. शिबंदी अफाट वाढवलीये. माणूस नाय तसा अफाट जिगरीचा...जिगरबाज!!!

अरे! इवलंस पोरं सुद्धा संभाजी राजाच्या पराक्रमानं मोहित झालंय. स्वराज्यासाठी मारायला उभं राहिलंय......हा हा "सर्जा संभाजी"

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २६

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबानं आदिलशाही जिंकली, कुतूबशाही ताब्यात घेतली, आणि मग! औरंगजेबाला पुन्हा उत्साह आला..."पुरें हिंन्दोस्थान के आलमगीरं होना चाहतें हम!"...हा दख्खन फक्तं खुपतोय त्याला दख्खन! अनुमान तर बदलून घ्यावचं लागलं होतं, त्याला वाटलं होतं "संभाजी" म्हणजे "शिवाचा" नादान तख्तनशील वरीस...बदलला अनुमान. दहापटीनं तापदायक आहे संभाजी शिवाजीराजापेक्षा.

अरे! त्या शिवाजी राजांनी कधी "बुऱ्हाणपुरं औरंगाबादला" कधी हात घातला न्हवता...का तरं औरंगजेब चालून येईल. पण! हा संभाजी गादीवरं आला आणि त्यांनी पहिल्यांदा "बुऱ्हाणपुरा" धुतलं, औरंगाबाद लुटलं. अरे! सळो कि पळो करून सोडलं यांनी.

भर दरबारात औरंगाजेबानी विचारलं..."मेरे सब घराने में...हमारें तैमूरं के घराने में हुआ ऐसा कोई शख्स पैदा जो रणतर्रमर्रा हो" आणि सगळ्या सरदारांनी सांगितलं..."ना हुजूरं ना"......"याद रखों, ये औरंगजेब या ख़ुद मरेगा या उस "संभा" को मरेगा, ये पेहला आलमगीरं होगा जो रणपरं मरेगा...या उस "संभा" को मारेगा!" आणि चिवटपणे निघाला औरंगजेब पण! त्याला माहितीये संभाजीला उघड्या मैदानात पराभूतच नाही करू शकतं आपणं. मग! अखं लढाओ...फितुरांना पुन्हा मदतीला घेतलं. पन्हाळ्यावरं कैद केलेल्या मंत्र्यांना संभाजी राजांनी पुन्हा पदं देऊन सोडून दिलं. पण! संभाजी राजांचा मोठेपणा त्यांना पेलता नाही आला. या मंत्र्यांनी पुन्हा संभाजी राजांवर तीन वेळा विषप्रयोग केले, तिन्हीवेळा संभाजी वाचले, तिन्हीवेळा त्यांनी मंत्र्यांना माफी दिली. पण! मंत्र्यांचा कावा, कारस्थानी चालूच राहिला.

हे मंत्री अकबराकडं गेले...औरंगजेबाचा पुत्रं त्याला सांगायला लागले..."तुम्ही जरं संभाजीला ठारं मारायला आमची मदत करत असाल तरं आर्ध "स्वराज्यं" आम्ही तुम्हाला देऊन टाकू" यांच्या बापजाद्याची जाह्गीरं असल्यासारखी संभाजींच्या खुनाची सुपारी हे अकबरला द्यायला निघाले. तो अकबर प्रामाणिक निघाला, त्यांनी खलिता संभाजी राजांना पोहोचवला. नावं मिळाली आणि मग मात्रं संभाजींनी या सगळ्या मंत्र्यांना हत्तीच्या पायी दिलं, भिंतीत छिलून मारलं, रायगडच्या टकंमकं टोकावरनं खाली लोटून दिलं. जे केलं ते योग्यच केलं. त्यांना मारलं नसतं तरं संभाजींना मरावं लागलं असतं आणि स्वराज्याचा ग्रंथ कधीच आटोपला असता.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २७

(वाचा आणि शेअरं करा)

न्यायासना पाठीमागं "सिंहासन" आणि सिंहासना पाठीमागं "धर्मासन" उभं राहिल्याशिवाय "राजाची" आणि "राज्याची" प्रगती होत नाही हे संभाजींना माहितीये. आणि संभाजी राजांचा कारभार तसाच आहे. पण! हे फितूरं पुन्हा...पुन्हा औरंगजेबाने फितवले. आता उघड्या मैदानात नाही आता काव्यानेच डाव मांडायचा. संभाजी राजे आहेत तेवढे रायगडावरं. रायगडं म्हणजे "गरुडाच्या बस्खनीसारखा", वाऱ्यालाही जिथं आत शिरता येणारं नाही, आणि आंत शिरलं वारं बाहेरं पडणारं नाही इतका बुलंद आणि बेदाग. या रायगडवरनं संभाजींना पकडनं, हरवन मुश्किल आणि मग! औरंगजेबाने डाव आखला..."संभाजीला रायगडच्या बाहेरं काढा!" आणि फितूरं मदतीला आले. "गणोजी शिर्के" संभाजी राजांचे मेहुणे, वतनाचा न दिल्याचा राग त्यांचा. त्यांचे खटले "कवी कालाशांकडे" होते. "देसाई सावंत" आणि "गणोजी शिर्के" यांचे खटले कवी कलशापुढं आले. या फितुरांनी शिर्केंची समजूत करून दिली कि, "कवी कलश तुमच्या विरोधात" आणि त्या दिवशी कवी कलशांनी नेमका खटल्याचा निकाल सावंतांच्या बाजूनं दिला आणि शिर्केंची खात्री पटली. कवी कलश विरोधकच आणि शिर्के सरळ कवी कलशांवर चालून गेले आणि कवी कलश पळून "खेळण्यावर" म्हणजे "विशाळगडावर" आले. संभाजीराजांना पत्रं लिहिलं. "शिर्केंनी मार दिला......पळून खेळणीयांस आलो!"

संभाजी राजे कडाडले..."नात्याचे पदरं जरं स्वराज्याची कदरं करत नसतील तरं..काय करावं आम्ही?" विचारते झाले

येसूबाईना आणि येसूबाई म्हणाल्या..."सौभाग्याला स्वराज्यं आणि स्वराज्याला सौभाग्यं मानतो आम्ही, नात्यांचे पदर जरं स्वराज्याची कदर करत नसतील तरं राजे बिनघोरं निघा...भले ते आमचे बंधू असले म्हणून काय! आणि स्वराज्याची स्वामिनी कडाडली आणि स्वामी निघाला शिर्केंवर, तुटून पडला, शिर्केंच शिरकाण केलं, शिर्के पळून गेले आणि संभाजी राजे पन्हाळ्यावरं आले.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २८

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांना कानोकान खबरं न्हवती, आपण औरंगजेबाच्या गहऱ्या चालीत फसत निघालोय. औरंगजेबाची चाल यशस्वी झाली होती. संभाजींना रायगडाबाहेरं काढण्यात यश आलं होतं. आता संभाजी गेले होते पन्हाळ्यावरं, पन्हाळ्यावरं होते सरलष्करं सेनापती "मह्लोजी घोरपडा" वयं वर्ष ६०, शरीरं थकलं असेलं पण! मनगटातली रग आणि छातीतली धग विझली न्हवती. आल्या आल्या संभाजी राजांनी विचारलं..."मालोजी काका मुकर्रब खानाची कोण हालचाल?" आणि कडाडला मालोजी गावराण बोलीत...

"राजं..! त्यो काय इतूयं,

आम्ही हाय न्हवं,

रेटतू की त्याला...!"

आणि संभाजी म्हणाले..."मालोजी तुमच्या खांद्यावरं तरं सुरक्षित आहे स्वराज्यं"...पण! त्याचं वेळी हेर धावत आला, संभाजींना सांगता झाला..."राजं ! .. राजं ! रायगडला यातीगात खानाचा घेरा पडलाय" आणि काळजाचा ठोका चुकला "रायगड" म्हणजे "राजधानी", महाराणी तिथं आहेत, बाळंराजे तिथं आहेत आणि "स्वराज्यं सिंहासन" तिथं आहे...कुणी डावेनं डाव मांडला? आणि संभाजी राजे निघाले. मह्लोजींना सांगितलं..."लागली गरजं तरं हाकं मारू, लगोलग येउन मिळा आम्हांस!" आणि संभाजी अवघ्या "शंभर" भालायतांसोबत निघाले रायगडाकडं.

पण! तत्पुर्वीचा औरंगजेबाचा खलिता मुकर्रब खानाकडं आलाय..."तो संभाजी रायरीचा जहागीरंदार शिर्केंशी भांडण केलंय म्हणून तिकडं आलाय, आता नामी संधी आहे". आणि ती बातमी घेऊनच मुकर्रब खानानं रायगडला जाणाऱ्या सगळ्या वाटा आधीच जेरबंद करून ठेवल्या. संभाजी राजांनी वाटा शोधल्या पण! वाटा सगळ्याच गिरफ़्तारं, जेरबंद मुकर्रबच्या तावडीत. एक वाट होती शिल्लकं, गर्दबिकटं, वहिवाट असलेली, निबिड, काट्या-कुट्याची, किर्र झाडांची, भयाण कडेकपाऱ्यांची, दऱ्या-खोऱ्यांची बिकट..संभाजी राजांनी तिचं वाट निवडली..."" संगमेश्वराची ""

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग २९

(वाचा आणि शेअरं करा)

बघता बघता मुकर्रब खान हाजीरं झाला संगमेश्वरंला आणि मराठ्यांचा पाचशे माणूसमेळं पहिला आणि कडाडला..."यल्गारं...!!!"

......"हर हर महादेव"ची आरोळी घुमली आणि बघता बघता तलवारी खणानू लागल्या. झाडा-पानांवरची पाखरं...फड..फड..फड करत उडाली. अरे! काळोखं थरारला, रात्रं थरारली आणि बघता बघता आक्रोश किंकाळ्यांनी परीसरं दुमदुमून गेला.

शौर्याची लाट!..लाट!..लाट! अवघं तुफान..तुफान झालं. अरे! एक-एक मावळा झुंजत होता शर्तीनं लढतं होता...बस्सं!!! मोघलांचा काताकुट करत होता.

शिवाजीराजे सांगायचे "माझा एक मावळा शंभराला भारी आहे". इथं एक मावळा पाचाशेला भारी पडतं होता. मोघलांना..बस्सं!!! कापत होता...सपासप्प्प!!!...मुकर्रब बघत होता पण! मराठ्यांच्या शौर्यापुढं काही..काही चालत नाही. आपल्या राजासाठी, स्वराज्यासाठी इथंला एक-एक गडकोटासारखा झुंजत होता. अरे! स्वतः साठ वर्षाचा "मालोजी" दोन्ही हातात समशेरं घेऊन लढतोय अफाट!..अफाट! ताकदीनं...येईल त्याला सरळं कापतोय. रक्ताच्या चिळकांड्या,,,मांसाचे लद्दे......अरे! खचं प्रेतांचा...! आणि मुकर्रबनं ते शौर्य बघितलं आणि कडाडला..."इस बूढें को पहलें लगाम डालों" तसं सगळं यौवनी सैन्यं महलोजी बाबांच्या भोवती गोळा झालं. अभिमन्यू चक्रव्यूव्हात अडकवा तसा मह्लोजी अडकला, दोन्ही हातात समशेरी. याच समयी मोघलांचे एकाचंवेळी वारं झाले, हातातल्या दोन्ही तलवारींनी ते पेलंले. मह्लोजी खाली बसला, साठं वर्षाचं रगदारं शरीरं...रक्तं उफाळल...वीज लखंलखंली सप्प्प्प्प ..!!! रक्ताच्या चिळकांड्या उडवीत पहिली फरी गारं झाली,,,दुसरी फरी,,,तिसरी फरी...अरे! तो जोश वेगळा, तो आवेश वेगळा...ते शौर्य बघितलं आणि मग! मुकर्रबला कळलं ""वाघ"" कसा असतो.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३०

(वाचा आणि शेअरं करा)

मुकर्रब खानानं आपले पेरून ठेवले होते फितूरं तिथचं. आणि "संगमेश्वरला" शंभर भालायतांसोबत संभाजी राजे "संगमेश्वरंच्या" वाटेनं निघाले...निघाले आणि एवढीच बातमी मुकर्रब खानाच्या कानावर पोहोचवण्यात आली..."संभाजी राजे संगमेश्वरला सरदेसायांच्या वाड्यात मुक्कामाला थांबले"...मुकर्रबला पक्की बातमी, अवघ्या शंभर भालायतांसोबत राजे संगमेश्वरला सरदेसायांच्या वाड्यात आहेत. "नामी संधी आहे लगोलग निघा" आणि मुकर्रब खान पाच हजारांच सैन्यं घेऊन टाकोटाक निघाला, पन्हाळ्याला बगल देत निघाला संगमेश्वरच्या दिशेनं.

पन्हाळा अंधारात गुडूप झालेला. पहारेकरी पहारा देत होता. अचानक कायतरी दिसलं आणि चबकला..बेंबीच्या देठापासनं कडाडला..."मालोजी बाबा,,,काळोखं उजळंत तलुता चाल्याती" आणि मालोजीच्या काळजाचा ठोका चुकला..."कुण्या रोखानं?"......"जी संगमेश्वराच्या"......आरं!..राजं हायत...आरं! राजं हायत...कुणी गनिमानं डाव साधला, अरे! निघा..निघा शिबंदी उठवा...राजांची जान वाचवायला पायजे...आरं! निघा...!!!

आणि बघता बघता मावळा सज्ज झाला. मुकर्रब खानाच्या पाच हजार फौजेला बगल देत "मह्लोजी बाबा" पाचशे मावळ्यासैत दौवडू लागला...दौवडू लागला आपल्या राजासाठी, राज्याच्या रक्षणासाठी निघाला...निघाला आला संगमेश्वरामध्ये वेस ओलांडून धपापत्या उरानं..."राजं..!,,,राजं..!,,,राजं..! निघा..निघा राजं..! नावडी जवळं करा"...संभाजी खाली आले "का?..का? मालोजी...काय गडबडं?...कोण आफत?"......"राजं.! आफत लयं मोठी राजं.!,,,राजं.! निघा नावडी जवळं करा...गनिमानी गावं येरबाडलयं राजं.!,,,,,,राजं.! निघा...!!!

संभाजी राजे म्हणाले, "नाही मालोजी तुमच्या थकल्या खांद्यावर "स्वराज्यं" सोपवून जायला "राजे" नाही झालो आम्ही...मरू इथंच, झुंजू इथंच पण! रण टाकून पळणारं नाही"

..."नाही राजं.!,,,लाखं मेलं तरी चालतील पण! लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे...राजं!..निघा,,,नावडी जवळं करा राजं.......!"

पण! त्याचं वेळी मुकर्रबची फौज संगमेश्वरच्या वेशीला भिडलेली. पाचशे मावळा आमचा डोळ्यांत डोळा घालून बघत होता. बस्सं!!! अफाट...अफाट सेनासागरं आणि टिचंभर पाचशे मावळा राजाच्या रक्षणासाठी सिद्ध आहे.

मशः

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३१

(वाचा आणि शेअरं करा)

मह्लोजी बाबांचं अफाट!...अफाट!...अफाट! शौर्य पाहून त्याचवेळी मुकर्रब खानानं चालं खेळली. कमानमारं ला बोलावलं, हा मह्लोजी असा आवरणारं नाही आणि तिसऱ्या बाजूकडं लढत्या मालोजीवर नेम धरंला, तीरं सुटला...उजव्या दंडात घुसला हातातली तलवारं निखळंली...दुसरा तीरं कंठात...दुसरी तलवारं निखळंली...! निशस्त्र झाला मह्लोजी आणि गुळाच्या ढेपेला मुंग्या ढसाव्या असं यौवनी सैन्यं मह्लोजीला ढसलं.

अरे! शरीरावरं जागा शिल्लखं राहिली नाही जिथं वारं झाला नाही. रक्ताळंला मह्लोजी मातीत पडला. अखेरंचा श्वास फुलंला...डोळे लवले...ओठं हलले. त्या श्वासानं माती उंच उडाली आणि त्या उंच उडाल्या मातीला मह्लोजी सांगता झाला..."सांगा माझ्या राजाला, हा मह्लोजी गेला..मातीत मेला, पण! मातीत नाही मेला..."मातीसाठी मेला"......अरे! मातीत मारणारे कैक असतात, पण! "मातीसाठी मारणारे फक्तं मराठे असतात" हे सांगत गेला.

आणि मह्लोजी नावाचा बुरुंज ढासळला आणि यौवनांच सैन्यं सैरा..वैरा सुटलं,...सुटलं संभाजींच्या मागावरं, पण! संभाजी राजांनी तत्पुर्वीच आपल्या माणसांना सांगितलं...जमेल तसं, जमेल तिथून निसटायचं साऱ्यांनी. खंडो बल्लाळं, संताजी घोरपडा एका बाजूनी निसटले होते. "संभाजी राजे" आणि "कवी कलश" दुसऱ्या बाजूनी "नावडी नदीच्या" दिशेने दौडू लागले

होते. "कवी कलश" अचानक घोड्यावरून खाली पडले आणि जोरात गर्जना केली कवी कलशांनी..."राजा जी, मैं ग़िर गया हूँ!...मैं ग़िर गया हूँ!"

संभाजी वापस आले आणि कवी कलशांना सोबत घेतलं आणि दौडू लागली घोडं,,,नावडीच्या किनाऱ्याकडं......

आणि बघता बघता संभाजींचा घोडा नावडीच्या काठावरं आला, सामोरं काठावरं माणसं दिसली..आपली वाटली..संभाजी राजांनी काठं बघितला..........

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३२

(वाचा आणि शेअरं करा)

संभाजी राजांनी काठावरंच्या नौका बघताच संभाजींची नजरं फिरली...पाहतो तरं काय! आत्तापर्यंत ऐकलं होतं नद्या समुद्राला येउन मीळंतात, पण! इथं उलटं...त्या नावडी नदीला मुकर्रब खानाचा सेनासागरं भेटायला आला होता. काठावरं होता "शिवपुत्रं संभाजी"...चाहोबाजूंनी "संभाजी राजा" रेकला गेला, चाहोबाजूंनी यौवनांच सैन्यं भरलं...मध्ये "संभाजी" आणि "कवी कलश" आणि कडाडला मुकर्रब..."खींचलों तलवारं उसकी!"......पण! तलवारं घ्यायचं कुणाचं धाडसं होईना, कुणीतरी एक पाऊलं उचलायचा आणि संभाजींची नुसती नजरं वर उठायची चारं पावलं मागं सारायचा तो...नाही जिगरं झाली!

अखेरं! मुकर्रब खानानं चाहोबाजूंनी दोरखंड फेकले आणि "संभाजी राजे जेरबंद झाले",,,"मराठ्यांचा छत्रपती अडकला",,,"छावा संभाजी राजा जेरबंद झाला",,,"शिवपुत्रं संभाजी मोघलांच्या कैदेत फसला",,,"फितुरांची चाल यशस्वी झाली",,,"मराठ्यांचा मुकूटं मोघलांच्या पायात पडला"......पण! मस्तकं ताठंच होतं, छातीही तशीच, रगही तशीच आणि बाणेदारंपणाही तसाच.

बघता बघता मुकर्रब खानानं दस्त केलं "संभाजी राजांना" आणि रहुल्ला खानाला तो म्हणाला, "जीतनी जल्द हों सकें उतनी जल्द निकलना चाहियें यहाँसे...अगर! पता चला इन मराठों को तो यंही कबरं बना डालेंगे अपनी"

आणि आश्चर्य वाटेल "संगमेश्वरं" ते "बहादुरं गडं" हे साडे तीनशे मैलांचं अंतर आहे. (एसटी नी जायचं झालं तरी दीड दिवस लागतो) मुकर्रब खानानं हे अंतर संभाजींना घेऊन चालत...अवघ्या साडे चारं दिवसांत कापून पुरा केलंय. कुत्रं मागं लागल्यासारखा पळतं होता.

पण! दुर्दैव मराठयांच...""किल्ल्याच्या तटाशेजारुनं संभाजींना नेलं जात होतं पण! तटावरंच्या धारंकऱ्याला माहिती न्हवतं आपला राजा कैद झालायं"",,,,,,""अरे! गावच्या वेशीवरनं संभाजींना नेलं जात होतं पण! गावातल्या वारकऱ्याला आणि गावकऱ्याला माहिती न्हवतं आपला राजा कैद झालायं""...कळेपर्यंत संभाजींना सुरक्षित ठिकाणी पोचवलं होतं.

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३३

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेबाला खबरं द्यायला हेरं धावत आला होता..."हुजूरं!...हुजूरं!,,,बड़ी ख़ुशी की खबरं हैं, संभा गिरफ़्तार हुआ!"

आणि आल्या हेरला औरंगजेब विचारत होता..."पिक़े तों नहीं आयें, क्या बखतें हों!"......"हाँ...हुजूरं! संगमेश्वरं में मुकर्रब खानने दस्त कर लिया उन्हें!"

"आला ताला की मेहेरबानी, शब्बें रात के जश्न होना चाहिए, आख़िर आ ही गया दख्खन का चुहाँ शिकंज में, अब दिखायेंगे उसें...लाया जय उसें शानोशौखतसें, पेहना जाय तख्तांकुलाँ..."

आत्तापर्यंत त्यानी आपल्या खांद्यावर मराठी तख्त पेलंल असेल, आता त्याच्या खांद्यावरं "तख्ताकुलाँ" ठेवा. आत्तापर्यंत त्यानी "राजवस्त्र" घातली असतील, आता त्याला विदूषकी झबली घाला. आत्तापर्यंत त्यानी "मराठेशाहीचा मुकूटं" मिरवला असेल, आता त्याला घुंगरं असलेली विदूषकी टोपी बांधा. आत्तापर्यंत त्यानी "राजअलंकार" घातले असतील, आता त्याला "पोलादी साखळंदंडाने" जखडवा. आत्तापर्यंत राजा म्हणून..."घोड्यावरनं, मेण्यातनं, पालखीतनं, हत्तीच्या अंबारीतनं गेला असेल, आता त्याला उंटाला बांधा. आत्तापर्यंत राजाला म्हणून "नगारे" वाजले असतील, आता ढोल ताशे बडवायला सुरवात करा. कळूद्या महाराष्ट्राला..."आलमगीरं औरंगजेबनी "संभाजी" गिरफ्तारं केलायं"

आणि बरंहुकूम निघाली धिंड..."विदूषकी झबली" घातली,,,"घुंगरं असलेली टोपी" अडकवली,,,"काटेरी साखळंदंडाने" जखडवलं,,,"उंटाला बांधलं" आणि निघाली धिंड......वाजत गाजत!!!

अरे! कुठल्या राजाच्या वाट्याला आली हि विटंबना...??? कुणी सोसलं...???

Download From :  https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३४

(वाचा आणि शेअरं करा)

अरे! मोघली छावणीत कल्लोळं...कल्लोळं माजला होता आनंदाचा, आतुरंले होते सारे......

अरे! नऊ वर्ष ज्याने औरंगजेबाच्या दिमाखात सैतानी गोंधळ घातला तो "संभाजी" आहे कसा...? कसा दिसतो...? कसा आहे तो...?...कोणं!..कोणं!..कोणं! अरे! कोणं कुणाच्या झाडांवर!,,,कोणं कुणाच्या घरांवर!,,,कोणं कुणाच्या डोक्यांवर!,,,कोणं कुणाच्या खांद्यांवर! उभा राहून बघत होते..कसा आहे?...कसा आहे?...""संभाजी""

आणि निघालीये धिंड वाजत गाजत!!!

अचानक कुठूनतरी भिरं-भिरंनारा दगडं यायचा...धप्प्प्! छातीवरं आदळायचा...रक्ताची चिळंकांडी यातनेचा कल्लोळं उठायचा!...कुणीतरी यायचं उंटाची शेपटी पिरगंळायचं!, उंट थय्या!...थय्या! नाचायचा अंगावरचे काटेरी साखळंदंड टोचायचे!,,,बोचायचे!,,,जागोजागी जखमा करायचे!. कुणीतरी यायचं अंगावरं थुंकायचं!...कुणीतरी यायचं एखादं शीवी द्यायचं!...कुणीतरी यायचं तलवारीच्या टोकानं संभाजींच्या अंगावरं रेषा उठवायचं!,,,रेषेबरोबर रक्ताची धारं लागायची...अरे! मातीवरं रक्तं..रक्तं मुद्रा उमटवीत जायंची!...अरे! कुणी सोसलं???

अरे! विंचवाच्या लवलव करणाऱ्या वेदना कुणाच्या वाट्याला आल्या?......का? अरे! झुकला असता, वाकला असता, नमला असता तरं ऐश मध्ये जगला असता...मग! का नाही केलं?...का सोसतं राहिला सगळं?...का सहन करत राहिला ही विटंबना?......"स्वराज्यं अस्मितेसाठी"..."स्वराज्यासाठी"..."मराठी दौलतीसाठी"

इतका इतका अनन्विक छळं!...इतके रक्ताळंले होते संभाजी,,,इतके "शेंदूर फासल्या हनुमानासारखे दिसत होते...बस्सं! इतके"...जागा ठेवली न्हवती रे शरीरावरं वारं..वारं करायची......

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३५

(वाचा आणि शेअरं करा)

एवढं सगळं सोसून सुद्धा "छावा" होता ताठं...झुकली नाही मान...वाकला नाही कणा...तसाच बाणेदारंपणे आला औरंगजेबाच्या दरंबारात..."तख्तासीन झालेला आलमगीरं औरंगजेब", दरंबारात आल्या आल्या वजीरं आसद खान कडाडला..."संभा..!,,झूक जाओ आलंपना कें सामनें"...आणि कडाडला "कवी कलश"..."राजा हैं वो झुकेंगे नहीं...झूकाऐंगे !"...........खमोश्श्श्श्!!!............सर्ररंदिशी समशेरं आली गर्दनेवरं......"चूप्प्प्!...चूप्प्प्!,,,याँद रखं कैद में हैं तू...आला ताला कें दरंबार में हैं......चूप्प्प्!!!

पण! त्याचवेळी आवाज ऐकू आला..."सबूरं!......आसद......सबूरं!,,,,,,अभीं बहोंत पूछना हैं इसे"...आणि " आस्तें क़दम, शेहंशाह हिंदोस्तां...आलमगीरं गाझी औरंगजेब"......तख्तावरनं खाली उतरला, संभाजीपुढं आला. तो रक्ताळंला "संभाजी" एकदा न्याहाळला आणि नजरं स्थिरावली डोळ्यांवर...तीचं नजरं..तेच तेजं आणि औरंगजेब म्हणाला......

"नौ बरस का था, तब ये मिलां था हमें आगरा में...तब पूछाँ हमनें इसें, क्यों रे संभा तुम्हे हमारा ड़रं नहीं लगतां???...और इस संभा नें ज़वाब दिया था,,,हमें किसी का ड़रं नहीं लागतां लेकिन हमारीं वजहं से सबकों ड़रं लागतां हैं!......सच कहाँ था काफ़रं ने, कभी ठंडक ना मिलने दी......लेकिन अब नहीं,,,अब नहीं आला ताला की मेहेरंबानी आखिरं आज कैद में हैं तू हमारें" आणि

त्या खुदाचे आभारं मानायला औरंगजेब गुडघे टेकून खाली बसला.

त्याची ती अवस्था बघून संभाजी राजांनी कवी कलशांना विचारंल..."कवीजी, कवी आहात आपण..मग! या प्रसंगावरं सुचते का एखादी कविता?"...आणि आश्चर्य वाटलं कवी कलशांना...अरे! काय माणूस हा,,,मृत्युच्या गोठात आहे, औरंगजेबाच्या दरबारात आहे याला भीती नाही भयं नाही. हा माणूस म्हणतोय सुचते का एखादी कविता..ही काय कविता ऐकायची वेळं आहे!...कवी म्हंटला "हां हां राजन का नाही, ऐका!...."राजन तूम हो सांचे..खूब लढे हो जंग!!!..देखं तुम्हारा तेज...तखत त्यजत औरंग!!!"

अहो! राजे...काय लढलात तुम्ही जंग!...काय तुमचं तेज!...काय तुमचं शौर्य!....राजे! तुमचं तेज बघून औरंगजेब स्वतः स्वतःचे सिंहासन त्यागून तुमच्या पुढं येऊन गुढघे टेकून बसलाय..................बहोत खूब!!!

.............खमोश्श्श्!!! सर्रर्रदिशी औरंग ताडदिशी उठला,,,,चुप्प्!..चुप्प्!

"बता संभा...बताओ!,,,कहाँ रखां हैं ख़जाना?...कहाँ रखीं हैं लूँट?...कहाँ रखां हैं ख़जाना?"......तसा कडाडला संभाजी, "अरे! हिंदोस्थान आमचा ख़जाना, इथं मातीचा कण अन् कण मानतो मी सोनं...औरंगजेब तू गिळंलास खजाना, तू गिळंलास हिंदोस्थान...पण! आम्ही मागणारं नाही तुझ्यासारखे होणारं नाही भिखारी...अरे! हिंदोस्थान हाकं मारुनं भिकं देतो तुझ्यासारख्याला...घेत नाही असा, घेऊ मनगटाच्या बळावरं........बस्सं! चर्रर्रफडत राहिला औरंगजेब चर्रर्रफडत.........

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३६

(वाचा आणि शेअरं करा)

औरंगजेब म्हणाला, "ये मराठें क्या खिलांतें हैं अपने बच्चों को, क्यों पैदा नहीं ऐसा एक भी शख्स हमारें जनाने में"............"हे मराठे आपल्या पोरांना काय खायला घालतात, का? असलं एक तरी पोरगं माझ्या घरात नाही जन्माला आलं"......आणि संभाजी राजे म्हणाले, "अरे!...तुझ्या पोटी कसा जन्मेल संभाजी?......अरे!...कसा जन्मेल संभाजी तुझ्या कुशीत?......संभाजी जन्मेल तो "शिवछत्रपतींच्या कुशीत" आणि "महाराष्ट्राच्या मुशीतचं"

अरे! स्वतःच्या बापाला विष देणारा तू, स्वतःच्या भावाची खुलेआम कत्तलं करणारा तू...तुझ्या पोटी कसा येईल संभाजी?......संभाजी येईल सह्याद्रीच्या कड्यांवर आणि बस्सं!!! तुझ्या नरड्यावर...

याद राख, महाराष्ट्राच्या मातीत उभा आहेस तू इथंच माती करू......"आमच्याच वाटेवरं येउन,,,आमच्याशीच वाटमारी करणाऱ्याची,,,त्याच्या वाटेवरं जाऊन,,,वाट लावल्याशिवाय,,,आम्ही आमच्या वाटेवरं परतत नाही" हा इतिहास आहे आमचा.

आणि चमकला औरंगजेब त्याला काही कळेना,..."अरे! कैदेत कोण आहे तू का मी?"...पण! अखेरं विचारलं त्याने..."मेरें कौन कौन से सरदारं शामिल थे तुम्हें?"......आणि उसळला संभाजी, "अरे! तख्तासाठी रक्तावरं उलटणारी जात नाही आमची, आई भवानीचे भूतें आम्ही...विकणारं नाही इमान, होणारं नाही बेईमान, मरू इथंच...रक्ताचा अखेरंचा थेंब अन थेंब असेपर्यंत इथंच. याद राख,,,"सिंहाचे बछडे जगतात सिंहासारखे आणि मरतातही सिंहासारखेच...नको लागूस नादाला"

आणि अखेरं औरंगजेब संतापला......"ले जाव इसें हमारी नजरों के सामनें से, निकाल दो इसकी आँखें, इसकी आँखें जलाती हैं बहोत हमें!...काँट डालों इसकी जबान, इसकी जबान बोलती बहोत हैं!......जाsssव्!!!

आणि संभाजी राजांना औरंगजेबाच्या दरबारातनं नेलं गेलं.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३७

(वाचा आणि शेअरं करा)

आपल्याला आणखीन एक सांगितलं गेलं कि, औरंगजेब संभाजी राजांना म्हणाला, " तू जरं मुस्लिम व्हायला तयार असला तरं आम्ही तुला माफ करतो"...आणि संभाजी राजे त्याला म्हणाले, " तू जरं तुझी मुलगी मला देत असला तर मी मुस्लिम होतो"

संभाजींच चरित्रं असं तसं बदनाम केलंच आहे, पण! त्यांच्या शेवटच्या ज्वलाज्वलंत, तेजस आत्मबलिदानाच्या वेळी सुद्धा त्यांना असं बदनामीच्या आगात जाळावं हि केवढी मोठी शोकांतिका आहे. अरे! का जाळावं या आगीत त्यांना?...अरे! घडलंच नाही असं!,,,नाही झालं असं!

दोनचं सवाल विचारलेत औरंगजेबाने दोनचं, अरे! लिहिलंय औरंगजेबानी, त्याच्या मृत्युपत्रात लिहिलंय......"पहिली चूक केली शहाजाननी, त्यांनी "शहाजीला" जिवंत कर्नाटकात जाऊ दिलं, "शहजीच" मारला असता तरं "शिवाजी" उभाचं राहिला नसता...दुसरी चूक मी केली आग्र्याच्या भेटीतनं "शिवाजीला" जिंन्दा जाऊ दिलं, "शिवाजी" मारला असता तर " संभाजी" खडाच राहिला नसता...दोन चुका केल्यात तिसरी चूक करणारं नाही..."

आणि राहिला सवाल..." तुझी मुलगी देत असला तरं मुस्लिम होतो वगैरे वगैरे हा बाजारं गप्पांचा, काही अर्थ नाही यात", कारण! औरंगजेबाला एकूण पाच मुली होत्या...पहिली मुलगी "झेबुन्निसा" ती शहाजान बरोबर आग्र्याला कैदेत होती, ती तिथंच मेली, ती महाराष्ट्रात कधी आलीच नाही. मधल्या तीन मुलींची औरंगजेबानं लग्नं केलेली. आणि पाचवी "झीनतुन्निसा" ती औरंगजेबाबरोबर महाराष्ट्रात आलेली. "संभाजी राजे" ज्यावेळी पकडले गेले त्यावेळी "संभाजी राजाचं" वय होतं "बत्तीस (३२) वर्ष...बत्तीस" आणि या "झीनतुन्निसा"चं वय होतं "४६ वर्ष"......ज्यावेळी संभाजी राजे पकडले गेले त्यावेळी संभाजींच वय "३२ वर्ष" आणि या "झीनतुन्निसा"चं वय आहे "४६ वर्ष", कुठंला तिशीतला पोरगा म्हणेल मी पन्नाशीतल्या बाईबरोबर लग्नं करतो?,,,कुठंला इतिहास ऐकतो?

औरंगजेब - संभाजींचा संघर्ष "धर्मसंघर्ष" नाही तो "सत्तासंघर्ष" आहे. शिवरायांनी सगळ्या जातीधर्माला समान न्याय दिलाय. संभाजी राजांनी तेच पत्थ्य पाळलंय अगदी!...पण! औरंगजेबासारखा जहरी सर्प त्यांनी ठेचलाय.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३८

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं "वढबुद्रूकं तुळापूरंच्या वनस्तंभाला" संभाजींना बांधलं गेलं. औरंगजेबानं सुचवलेल्या सजेचा अंमल चालू व्हायचा. आणि बघितलं संभाजींनी आज्ञा आहे डोळे काढायची...""लालबुंद तापलेल्या तप्तं सळ्या"" घेऊन येताना दिसले हाप्शी. धुरांच्या रेषा हवेत सोडतायत सळ्या त्या...अरे! लालबुंद सळ्या...कळूनं चुकलं, डोळे जाणारं आता...संभाजींनी मिटले नेत्रं आणि डोळ्यापुढं उभा राहिले,,,"राजा शिवछत्रपती"..."माँसाहेब जिजाऊ"..."आई सईबाई"..."मावळे"...

"स्वराज्यं"..."गडंकोट"......अरे! याच डोळ्यांनी घेतलं स्वराज्याचं दर्शन,,,याचं डोळ्यांनी केलं इशर्त आपल्या मावळ्यांना,,,याचं डोळ्यांनी पाहिली स्वप्नें स्वराज्यं संवर्धनाची...अरे! याचं डोळ्यांनी घेतलं दर्शन..."आबासाहेबांच"...

"माँसाहेबांच"..."आऊसाहेबांच"...तेचं डोळे आणि उघडले डोळे संभाजींनी,,,डोळ्यापुढं दिसल्या "लालबुंद तप्तं सळ्या"...आल्या सामोरं घुसल्या आत...चर्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र,,,

यातनेचा नुसता कल्लोळं उठला.

सळ्या गेल्या आत...आत...आत निघाल्या त्याचं वेगानं बाहेरं,,,,,,डोळे न्हवते कुठंच उरल्या होत्या नुसत्या खोपन्या...काळ्या कबिंद...उग्रं तर्प बाहेरं फेकणाऱ्या......अरे! पायात काटा घुसला तरं आठ दिवस पाय धरुनं बसतो आम्ही,,,डोळ्यात लालबुंद तप्तं सळ्या गेल्या असतील...किती???...किती??? सोसलं असतील......अरे! किती??? सहन केलं असेल......किती???

अरे!,,,कुणाच्या वाट्याला आलाय हा अन्याय!...कुणी सोसला ह्या यातनांचा जहरी नंगा नाच???......का?......अरे! रगेल असते,,,रंगेल असते तरं झुकले नमले असते ना...कुठून आलं हे आत्मधैर्य???...कुठून आला हा आत्मसंयम???...कुठून आली हि जिगरंर्र्र्र्र्.....................

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ३९

(वाचा आणि शेअरं करा)

पण! आता सजेचा दुसरा अंमल चालू झाला होता. सजा होती "जबान काटायची". हाप्शी आले लखंलखंती नंगी तलवारं घेऊन. पण! संभाजींच तोंड बंद जीभं छाटणारं कशी?...मग! हाप्शी पुढे आले जबडा उघडायची कोशिश करू लागले...पण! जबडा उघडेना......मग! दोघांनी कानावरं दाबूजोरं दिला...प्रचंssssड दाब दिला...प्रचंssssड दाब पण! उघडेना जबडा, मग! एकानी

मस्तकावरं प्रहारं केला,,,पण! जबडा उघडेना......

अरे! उघडेल कसा...वाघाचा जबडा आहे,,,,,,"वाघाच्या जबड्यात...घालूनी हात...मोजती दात...हि आमची औकात,,, सांगणारा संभाजीये"

पण! तोपर्यंत एकानं युक्ती केली, संभाजींच नाक दाबून धरलं...श्वासासाठी जीव गलबलंला,,,तळमळंला,,,श्वासासाठी ओठं हलले,,,जीभं लवलवंली आणि त्या संधीचा घेतला फायदा......सांडशी घुसली आत,,,सांडशीत पकडली जीभं,,,ओढली बाहेरं,,,नंगी तलवारं लखंलखंली सप्प्प्प्प्प्प्प्प .............

तोंडातनं ओघळलं नुसतं लालबुंद रक्तं......जीभं पडली होती समोरचं वळंवळंत,,,ती सुद्धा तयारं न्हवती संभाजी राजांपासनं पोरकं व्हायचं......अरे! ज्या जीभेनं उमटंवले..."जगदंब - जगदंब" चे बोल,,,ज्या जीभेनं दिली किल्कारी..."हर हर महादेव"ची,,,ज्या जीभेनं केला जागरं,,,"जय भवानी"चा,,,जी जीभं म्हणत राहिली..."आऊसाहेब"...

"माँसाहेब"..."आबासाहेब"...ती जीभं पडली होती समोरंच वळंवळंत...........

एक नाही,,,दोन नाही तब्बलं चाळीस दिवस अनन्वीत अत्याचारं चालला होता...............

अरे! बोकडं सोलावं असं संभाजींच कातडं सोलून काढलं, त्याच्यावर मिठाचं पाणी टाकलं......चर्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र्र.....यातनांचा जाळं...जाळं झाला नुसता. कुणीतरी यायचं गुडघ्याच्या वाट्या काढून न्यायचं,,,कुणीतरी यायचं हाताची बोटं छाटायचं,,,कुणीतरी यायचं तलवारीच्या पात्यानं मांसाचे लगदे कापायचं...कुत्र्या, गिधाडांना खाऊ घालायचं......

अरे! कुणी बघितलं असतं तरं वाटलं नसतं..."मराठ्यांचा छत्रपती" आहे......अरे! भुतासारखी अवस्था झालेली. आणि एवढं सगळं होऊन सुद्धा आपला ""सर्जा"" सोसत राहिला,,,सहन करत राहिला...का???...आपण "शिवछत्रपतींचे पुत्रं" आहोत या "अस्मितेसाठी",,,"स्वराज्यासाठी",,,"राष्ट्रधर्मासाठी"......सहन करत राहिला चाळीस दिवस.

Download From : https://pdfseva.Net/

शंभू चरित्रं भाग ४०

(वाचा आणि शेअरं करा)

अखेरं! उगवंली "फाल्गुनी वद्य अमावस्या". ""११ मार्च १६८९"" औरंगजेबाची अखेरंची सजा, "संभाजींच मस्तक कलम करा". आणि संभाजींच मस्तकं छाटलं गेलं. भाल्याच्या फाळाला अडकवलं आणि ""गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी महाराष्ट्रात संभाजींच्या मस्तकाची गुढी उभारंली". निघाली वाजत...गाजत! आली "इंद्रायणी - भीमेच्या" तीरावरं त्या रेतीत रोवला तो भल्याचा फाळं आणि मस्तकातनं रक्ताचा एक थेंब पडला "इंद्रायणी - भीमेच्या" पात्रात आणि थरारली ""इंद्रायणी - भीमा""

अरे!!! याच "इंद्रायणी - भीमेनं" पाहिलं होतं ते शौर्य, ते धाडसं, ते साहसं, तो पराक्रम, ती ज्वलाज्वलन तेजसनिष्ठा, ते धैर्य, तो संयम, मानवी जीवनाच्या चिरंतन तत्वाशी जुळंलेलं "संभाजींच" ज्ञाननातं. ती "इंद्रायणी - भीमा" संभाजींच्या मस्तकाकडं

तिरक्या माना करून आसवं ढाळू लागल्या.

गेली ३५० वर्ष झाली "इंद्रायणी - भीमा" अजून रडतेचाय. सांगतेय! खरा "सर्जा संभाजीराजा" अजून कळंलाच नाही.

""शिवाजी महाराजांनी सांगितलं...कसं जगावं!!! आणि संभाजी महाराजांनी दाखवंल...कसं मरावं!!!...ती "इंद्रायणी - भीमा" आजही सांगतेय........

अखेरं! तो औरंगजेब म्हणत राहिला........

"सचमुच छावा हैं छावा शेरं का...

हमनें आँखें निकल दीं उसकी, लेकिन उसकी आँखें झुकी नहीं हमारें सामने"

"हमनें जबान काँट दी उसकी, लेकिन उस जबान से उसने मांगे नहीं रेहेम के दो लब्जं"

"हमनें हात तोड़ दिए उसके, लेकिन नहीं फैलाएं उसने अपने हात हमारें सामने"

"हमनें पांव काँट दिए उसके, लेकिन नहीं टेंकें उसने अपने घुटनें हमारें सामने"

"हमनें गर्दन काँट दी उसकी, लेकिन उसकी गर्दन नहीं झुकी हमारें सामने"

""सचमुच छावा हैं छावा शेरं का"

होंगे कामयाब कभीं या ऐसेही लौटना पड़ेगा ख़ाली हाथ देहेल्ली......

पण! दिल्लीला परत जाण्याचं भाग्यं औरंगजेबाच्या वाट्याला आलंच नाही.

संभाजींच्या रक्ताच्या थेंबाथेंबातून इथं पुन्हा जन्माला आला..."हजारों, लाखों"..."संभाजी"

अरे!!! संताजी,,,धनाजीसारखा एक-एक झुंजत राहिला, लढत राहिला...राजाशिवाय चौदा वर्ष महाराष्ट्र औरंगजेबाशी टक्करं घेत राहिला आणि अखेरं इथंच औरंगजेबाची कबरं बांधून मग शांत झाला.

हि प्रेरणा होती संभाजींच्या बलिदानाची, हि प्रेरणा होती संभाजी राजांच्या राष्ट्रप्रेमाची, राष्ट्रभक्तीची......


............!!जय शंभूराजे!!............

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

"छत्रपती संभाजी महाराज कि जय!!!"

Download From : https://pdfseva.Net/


शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज समाधी.